शुक्रवार, १ मार्च २०२४
किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - १९०
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 1 MARCH 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-190 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05

# टुंडाची निर्दोष मुक्तता

## 1993 च्या बॉम्बस्फोटातील मुख्य आरोपी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : 1993 च्या साखळी बॉम्बस्फोटातील मुख्य आरोपी अब्दुल करीम टुंडा याची न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे. राजस्थानमधील अजमेरच्या टाडा कोर्टाने हा निर्णय दिला आहे. बॉम्बस्फोटानंतर तब्बल 31 वर्षांनंतर न्यायालयाच्या निकालाकडे सर्वांचेच लक्ष लागेले होते. आता न्यायालयाने अब्दुल करीम टुंडाची निर्दोष मुक्तता केली आहे. यासह टाडा न्यायालयाने इरफान आणि हमीदुद्दीन यांना दोषी घोषित केले आहे.**



1993 मध्ये मुंबई, कानपूर, हैदराबाद, सुरत आणि लखनऊच्या काही ट्रेनमध्ये एकापाठोपाठ एक स्फोट झाले होते. या प्रकरणी अब्दुल करिब टुंडा, इरफान आणि हमीमुद्दीन यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले होते. अब्दुल करीम टुंडा याला 2013 मध्ये नेपाळ सीमेवरून पकडण्यात आले होते. सर्व आरोपींविरुद्ध टाडा कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणात आतापर्यंत दीडशेहून अधिक जणांची साक्ष झाली आहे.

सीबीआयने टुंडाला या बॉम्बस्फोटांचा मास्टरमाइंड मानले होते आणि त्याला 2013 मध्ये नेपाळ सीमेवरून अटक करण्यात आली होती. टुंडावर देशात विविध ठिकाणी दहशतवादाचे खटले प्रलंबित आहेत. टुंडाने तरुणांना भारतात दहशतवादी कारवाया करण्यासाठी प्रशिक्षण दिल्याचा आरोप आहे. जुनैद या पाकिस्तानी नागरिकासह त्याने 1998 मध्ये गणेशोत्सवादरम्यान दहशतवादी हल्ला करण्याची योजना आखल्याचेही बोलले जाते.

मुंबई बॉम्बस्फोटात सहभागी होण्यापूर्वी टुंडाने जलीस अन्सारी सोबत मुंबईतील मुस्लिम समाजासाठी काम करण्याच्या उद्देशाने 'तन्झीम इस्लाह-उल-मुस्लिमीन' या संघटनेची स्थापना केली. मध्य दिल्लीतील दर्यागंजमधील छत्तालाल मियाँ भागात एका गरीब कुटुंबात जन्मलेल्या टुंडाने उत्तर प्रदेशातील गाझियाबादमधील पिलखुआ गावातील बाजार खुर्द भागात आपल्या मूळ गावी सुतार म्हणून काम करायला सुरुवात केली. तो त्याच्या वडिलांना मदत करू लागला. वडिलांच्या मृत्यूनंतर टुंडाने उदरनिर्वाहासाठी भंगाराचे काम सुरू केले आणि कट्टरपंथी जिहादी दहशतवादी बनण्यापूर्वी कपड्यांचा व्यवसायही केला. 80 च्या दशकात तो पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआयच्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून लष्कर-ए-तैयबाच्या संपर्कात आला. टुंडाने मूलतत्त्ववाद स्वीकारला. अब्दुल करीम टुंडा लष्कर-ए-तैयबा या दहशतवादी संघटनेशी संबंधित असल्याचा संशय आहे. टुंडाने पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयकडून दहशत पसरवण्याचे प्रशिक्षण घेतल्याचा दावाही केला जात आहे.




# मंत्रालयात विशेष मदत कक्ष कार्यान्वित; गरीब रुग्णांना मोफत उपचार

## १० टक्के खाटा सवलतीच्या दरात उपचार करण्यासाठी राखून ठेवणे बंधनकारक

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील खासगी आणि धर्मदाय रुग्णालयात गरीब रुग्णांना मोफत उपचार मिळावे, यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून मंत्रालयातील मुख्य इमारतमधील पाचव्या मजल्यावर विशेष वैद्यकीय मदत कक्ष सुरू करण्यात आला आहे. या कक्षेच्या माध्यमातून गरीब रुग्णांना राज्यातील खासगी तसेच धर्मदाय रुग्णालयात १० टक्के आरक्षित खाटा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. राज्य सरकारने या राज्यस्तरीय वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख म्हणून आरोग्यदूत रामेश्वर नाईक यांची नेमणूक करण्यात आली आहे.

गरीब व दुर्बल घटकातील रुग्णांना मोफत व सवलतीच्या दरात वैद्यकीय उपचार मिळावे यासाठी उच्च न्यायालयाने योजना तयार केली आहे. त्यानुसार, प्रत्येक खासगी, तसेच धर्मादाय रुग्णालयाने त्यांच्या रुग्णालयातील एकूण खाटांपैकी १० टक्के खाटा गरीब रुग्णांवर मोफत उपचार करण्यासाठी व १० टक्के खाटा दुर्बल घटकातील रुग्णांवर सवलतीच्या दरात उपचार करण्यासाठी राखून ठेवणे बंधनकारक आहे. तथापि, गरीब व दुर्बल घटकातील रूग्णांना या खाटा उपलब्ध होत नसल्याच्या अनेक तक्रारी आल्या होत्या. ही रुग्णालये धर्मादाय स्वरूपाची असल्याने त्यांना सरकारच्या अनेक सवलतींचा फायदा मिळतो. मात्र ही रूग्णालये गरीबांसाठी आरक्षित खाटा पारदर्शकपणे उपलब्ध करून देत नसल्याने त्याचा फायदा सरकारला अपेक्षित असलेल्या गरीब रुग्णांना होत नाही. त्यामुळे या खासगी रुग्णालयातील १० टक्के आरक्षित खाटांसंदर्भात रुग्णांना अचूक माहिती मिळावी यासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून एक स्वतंत्र कक्ष उभारण्यात आला आहे.

धर्मादाय रुग्णालयातील आरक्षित खाटा गरीब व दुर्बल घटकातील रूग्णांसाठी पारदर्शक पद्धतीने तातडीने उपलब्ध करून देणे व त्यावर देखरेख ठेवण्याचे काम या कक्षामार्फत करण्यात येणार आहे. मंत्रालयाच्या मुख्य इमारतीमध्ये पाचव्या मजल्यावर असलेल्या या राज्यस्तरीय विशेष मदत कक्षाचे लवकरच देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. कक्षाचे काम रुग्णांशी संबंधित असल्याने उद्घाटन होण्यापूर्वीच ते सुरू करण्यात आले आहे. रोज अनेक गरीब व दुर्बल घटकातील रूग्णांना धर्मादाय रुग्णालयात खाटा उपलब्ध करून देण्याचे काम सुरू आहे. रुग्णांचे आधार कार्ड, शिधापत्रिका, तहसीलदारकडून उत्पन्न दाखला, डॉक्टरांकडून खर्चाचा तपशील, तसेच औषधाची चिठ्ठी आवश्यक आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात शिरला भला मोठा साप

आधुनिक केसरी न्यूज

**अलिबाग :** गुरूवारी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात दैनंदिन कामकाजाला सुरूवात झाली. सर्वजण आपापल्या कामात व्यस्त होते. खालच्या मजल्यावर असलेल्या नोंदणी शाखेत येणारे जाणारे याचिकाकर्ते आपली टपाल नोंदवित होती. साडेबाराच्या सुमारास एक महिला कर्मचारी कक्षातील जमा झालेल्या फायलीची आवरासावर करत असतांना, तिच्या हाताला स्पंजसारख्या वस्तूचा स्पर्श झाला. निटनीरखून पाहीले असता, फाईलींच्या आडोश्यात एक भला मोठा साप लपून बसल्याचे लक्षात आहे. सापाला पाहून कर्मचाऱ्यांची धांदल उडाली. घाबरून सर्वजण कक्षाच्या बाहेर जाऊन उभे राहीले. काही जण अपृप म्हणून तर काही जण भितीने सापाला बघत होते.

# अखेर महाविकास आघाडीचा जागावाटपाचा फॉर्म्युला ठरला


आधुनिक केसरी न्यूज


**मुंबई :** महाविकास आघाडीच्या जागावाटपाची महत्त्वाची माहिती 'टीव्ही9 मराठी'च्या हाती लागली आहे. शिवसेना ठाकरे गट लोकसभेच्या 48 पैकी 23 जागांवर लढणार आहे. त्यापैकी 2 जागा ठाकरे गट मित्रपक्षांना देणार आहे. काँग्रेसच्या वाटेला 15 ते 17 जागा मिळणार असल्याची माहिती मिळत आहे. तर राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाला 9 ते 11 जागा मिळणार आहेत, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. विशेष म्हणजे वंचित बहुजन आघाडी महाविकास आघाडीसोबत आल्यास अकोल्याची जागा दिली जाणार आहे. त्याशिवाय वंचित सोबत आल्यास त्यांना आणखी एक ते दोन जागा दिली जाण्याची शक्यता आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ठाकरे गट मुंबईत 4 जागा लढण्याच्या तयारीत आहे. शरद पवार गट उत्तर मुंबईसाठी उत्सुक नाही. त्यामुळे उत्तर मुंबईची जागा कुणी लढणार नसेल तर ठाकरे गट लढणार, अशी माहिती सूत्रांनी दिलीय.

ठाकरे गटाचा सुरुवातीपासूनच लोकसभेच्या 48 पैकी 23 जागांवर दावा आहे. विशेष म्हणजे यापैकी 21 जागांवर शिवसेना ठाकरे गट निवडणूक लढणार आहे. तर 2 जागा मित्रपक्षांना देण्याची तयारी ठाकरे गटाची आहे. यातली हातकणंगले ही एक जागा ठाकरे गट राजू शेट्टी यांच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेसाठी सोडायला तयार आहे. तर अकोल्याची एक जागा ठाकरे गट मित्रपक्ष असलेल्या वंचित बहुजन आघाडीला सोडायला तयार आहे.

ठाकरे गट मुंबईत 4 जागांवर लढणार ठाकरे गट मुंबईत 4 जागांवर निवडणूक लढण्याच्या तयारीत आहे. मुंबईतील 2 जागा काँग्रेससाठी सोडल्या जाण्याची शक्यता आहे. तर ठाकरे गट मुंबईत 4 जागा लढण्याचा तयारीत आहे. दक्षिण मुंबई, दक्षिण मध्य मुंबई, उत्तर पश्चिम मुंबई या जागांवर ठाकरे निवडणूक लढण्याची शक्यता आहे. ईशान्य मुंबई ही जागा ठाकरे गटाकडे आहे. पण काँग्रेस या जागेसाठी आग्रही आहे. दुसरीकडे वंचित बहुजन आघाडी बरोबर आल्यास ईशान्य मुंबई ही जागा वंचितला सोडली जाण्याची शक्यता आहे.

**ठाकरे गट 'या' जागांवर लढणार :** कोल्हापूरच्या जागेवर सध्या पेच आहे. ही जागा सध्या शिवसेना ठाकरे गटाकडे आहे. कोल्हापूरचे खासदार सध्या ठाकरे गटाचे आहेत. पण काँग्रेसला ही जागा हवी आहे. कोल्हापूरचे छत्रपती घराण्याचे वंशज शाहू महाराज छत्रपती यांच्यासाठी काँग्रेसला ही जागा हवी आहे. कोल्हापूरच्या जागेच्या बदल्यात ठाकरे गटाने काँग्रेसकडे सांगली जागा मागितली आहे. हातकणंगले ही जागा स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडे जातेय. तर रत्नागिरी-सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे, कल्याण डोंबिवली, पालघर, नाशिक, शिर्डी, जळगाव, मावळ, धाराशिव, परभणी, छत्रपती संभाजीनगर, रामटेक, बुलढाणा, हिंगोली आणि यवतमाळ या जागांवर ठाकरे गट निवडणूक लढवण्याची शक्यता आहे.



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




आधुनिक केसरी

*सागर पोहत बाहू बळाने ।।*
*नाव तयास ... मिळो न मिळो रे ॥ १*
*स्वयेच जो तेजोनिधी तरणी ॥*
*तदगृही दीप ... जळो न जळो रे ।। २ ॥*
*जो करी कर्म अहेतू निरंतर ॥*
*वेद तयास ... कळो न कळो रे ॥ ३ ॥*
*ओळख पटली ज्यास स्वतःची ॥*
*देव तयास ... मिळो न मिळो रे ॥ ४ ॥*

दरवर्षी लाखो लोक अंदमानला सावरकरांचे राष्ट्रीय स्मारक पाहण्यासाठी जातात. ती पावन भूमी पाहताना आजही आपण थरारून जातो. तेथे ज्या अंधारकोठडीत सावरकरांना ठेवले होते, ती पाहून आजही आपल्या जीवाचा थरकाप होतो. कसे राहिले असतील सावरकर तिथे ? कशी की काढली असतील इतकी वर्षे ? आपण आज कोरोनामुळे सहन कराव्या लागणाऱ्या लॉकडाऊनला कंटाळलो आहोत, अशा वेळी त्यांचे हे उदाहरण नक्कीच प्रेरणादायी आहे. त्यांना दोन जन्मठेपेची शिक्षा झाली होती. पण न भिता त्यांनी हे सर्व स्वीकारले. तेथून हा नरसिंह सुखरूप बाहेर आला आणि स्वातंत्र्यानंतरही समाजसेवेचे प्रचंड कार्य त्यांनी केले. जे सावरकरांवर टीका करतात त्यांनी हे लक्षात ठेवावे की हिंदी राष्ट्रभाषा व्हावी, हिंदुस्थान पुन्हा अखंड व्हावा, एका व्यक्तीला एक पद , मुसलमानांना सुद्धा मतदानाचा अधिकार असला पाहिजे, हा देश प्रजासत्ताक झाला पाहिजे ही तत्कालीन हिंदू महासभेची म्हणजेच सावरकरांची मागणी आहे. या सर्व गोष्टी त्यांनी जेव्हा देशाची राज्यघटना लिहिली जात होती, त्यावेळी सांगितल्या. सावरकरांनी मुस्लिमांसाठी मागितलेला मतदानाचा अधिकार, '1857 च्या स्वातंत्र्य समरात ' हिंदूंबरोबर मुस्लिमांनी सुद्धा जे योगदान दिले आहे त्याचा त्यांनी केलेला गौरव या गोष्टी सावरकर मुस्लिम द्वेष्टे नव्हते हे सिद्ध करतात. सावरकरांना भारतरत्न जेव्हा मिळायचे असेल तेव्हा मिळो, पण असे दहा भारतरत्न त्यांच्यावरून ओवाळून टाकले तरी कमी आहेत. भारतरत्न ते तर आहेतच. सावरकरांच्या सगळ्या कविता तर अप्रतिम आहेतच. पण शिवाजी महाराजांच्या गौरवार्थ लिहिलेल्या पहिल्या तीन ओळी त्यांनासुद्धा लागू पडतात. त्या इथे देतो आणि थांबतो.



## आनंदी पहाट

## वैचारिक मंथनासाठीच सोशल मिडीयाचा वापर करावा

आधुनिक केसरी

हल्ली अनेकजणांना सोशल मिडीयानं ग्रासलं आहे. फेसबुक, युट्यूब, व्हॉटस् ॲप इत्यादीच्या माध्यमातून अनकेदा बघायला मिळणाऱ्या काही पोस्ट, छायाचित्रं, व्हिडीओ, मजकूर हे सर्व कितपत सत्याची बाजू घेणारं असतं, हे समजणे अवघड असतं. त्यांत समाविष्ट असलेली नकारात्मकता मात्र थेट आपल्या अंतर्मनावर विपरीत परिणाम करायला लागते. कदाचित एखाद्या व्यक्तीचं यश देखील आपल्या मनांत नकारात्मक विचार निर्माण करण्यास कारणीभूत ठरू शकतं. अलीकडच्या काळांत अल्पवयीन मुलं-मुली नैराश्याचे शिकार होताना दिसत आहेत. नकारात्मक विचारांचं पर्यवसान रागात, उद्वेगात आणि कालांतराने गुन्हेगारीत होण्याचं प्रमाण अलीकडच्या काळांत खूपच वाढल्याचं दिसून येत आहे. आपल्या आचाराचा संबंध ग्लॅमरशी तर विचारांचा संबंध थेट ग्रामरशी असल्याचं प्रथम समजून घेणं अधिक जरुरीचं असतं. आपल्या विचारांतून आपल्या संकृतीचं आणि प्रकृतीचं दर्शन घडून येत असतं. पण विचारांपुर्वीच केलेल्या आचारातून काहीवेळा काहीजणांमध्ये विकृतीचं दर्शन घडतं, ते कोणालाच मान्य नसतं. एकूणच अशांतून नकारात्मक वातावरण निर्माण होत राहतं, ते अधिक तापदायक, घातक ठरू शकतं, ह्याची जाणीव होणं आवश्यक असतं. प्रगल्भ विचार आणि दिलदार मन लाभलेली कोणतीही व्यक्ती आकृती उरत नसते, तर ती स्वतःच एक कलाकृती बनून राहते. अशी व्यक्ती आपल्या संस्कृतीचं स्मरण ठेवून, स्वतःच्या प्रकृतीला अनुसरून, समाजातील विकृतीकरण थांबवण्यात सक्रीय असते. यांतूनच कलाकृती साकारली जात असते, पाहायला मिळते. अशा व्यक्ती आपलं जगण्यापलीकडचं जीवन सामाजिक बांधिलकीचं भान राखून नवनवीन कलाकृती साकारत असतात.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655




आधुनिक केसरी

## मुक्तीचाच रंग | मुक्त करी ||

आता कुठे जरा | लाभला विसावा ||
संग हा असावा | तुझा देवा ||१||
सोबती नसावा | अन्य दुजा कोणी ||
रमावे भजनी | एकांतात ||२||
सावलीने व्हावे | दासी ज्ञानोबाची ||
वाणी तुकोबाची | जन्म व्हावा ||३||
मुक्ता संगे गावे | ताटीचे अभंग ||
मुक्तीचाच रंग | मुक्त करी ||४||
ध्यानात घडावा | मौनाचा जागर ||
विठुचा गजर | नादब्रह्म ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८



## हितगुज



गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)

## गुरुतत्त्व


'गुरू' या शब्दाचा व्युत्पत्तिमूलक अर्थ आहे  अज्ञानाचा अंधार नाहीसे करणारे ज्ञानतत्त्व. ज्ञानतत्त्व माहितीपासून आत्म साक्षात्काराच्या ब्रह्मानंदापर्यंत सर्वत्र व्याप्त आहे. ते तेजोमान, प्रखर, दिव्य प्रकाशित आहे. ज्ञान-जिज्ञासेपासून निर्विकार तादात्म्य अवस्थेपर्यंत ज्ञान, मानव अंतःकरण व बुद्धीच्या सर्व क्षमतांना पुरून उरणारे 'चिद्' तत्त्व आहे. ते अनंत व अमूर्त आहे. 'श्रद्धावान् लभते ज्ञानम्' या गीता-वाक्यानुसार ज्ञानाची प्राप्ती करण्यासाठी अढळ, निष्काळ, निःसंदेह श्रद्धा आवश्यक आहे. गुरुतत्त्व निर्गुण ब्रह्मज्ञान आहे. प्रकाश प्रकाशात मिसळून जावा, त्या प्रकारे गुरुतत्त्वाशी सिद्धयोगी, आत्मसाक्षात्कारी, सद्गुरू, संत, अवलिया, परमहंस व्यक्ति सगुण स्वरूपात राहून ही एकरूप झालेल्या असतात. 'थेंब पावसाचा मिळताची सागरी, सागर बनूनी राहिला' अशी देहधारी सद्गुरूची व गुरुतत्त्वाची एकरूपता झालेली असते. संत कबीर म्हणतात त्याप्रमाणे - "लाली मेरे लाल की, जित देखूँ तित लाल। लाली देखन मैं गयी, मैं भी हो गई लाल।" गुरुतत्त्वाचे परम, अनंत अपार तेजोमय सौंदर्य निरखता-निरखता त्या सौंदर्याचा जबरदस्त पगडा माझ्यावर झाला, मी त्या तेजात खेचलो गेलो. सर्वत्र भरलेल्या त्या तेजात प्रवेश करताच मी देखील तेज बनून गेलो. इतक्या समर्पक, सोप्या शब्दांनी गुरुतत्त्व समजावून देण्याची किमया फक्त संतांच्या वचनातच आहे. कारण ते स्वानुभूतीतून उमटलेले उत्स्फूर्त उद्गार असतात.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

मुद्रा प्राणायाम सब,
बन्ध करे नहिं सन्त ।
गुरु प्रसाद फूले कमल, सन्त
मता पर अन्त ।।४९।।(स्वर्वेद
प्रथम मण्डल प्रथम अध्याय)
०१/०१/४९

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : राजयोगातील चाचरी, भूचरी, अगोचरी, उन्मुनी, खेचरी आणि हठयोगातील वज्रोली, योनि मुद्रा आदि क्रिया तसेच प्राण विज्ञानातील सर्व प्राणांचा विकास, स्तंभनाची क्रिया तथा मूलबंध, जालंधर बंध, उड्डियान बंध या सर्व प्राकृतिक हठयोगातील क्रिया विहंगम योगी संत करत नाहीत. विहंगम योगात सद्गुरु प्रसादाने शरीरातील सर्व कमल आपोआप फुलतात. संतमत ब्रह्मविद्येचे हे विशिष्ट अनुभव तत्त्वज्ञान आहे. विहंगम योग संतांचा आहे. यात बाहेरील कर्मकांडांची आवश्यकता नाही. स्वाभाविकपणे आत्मशक्ती एकत्रित झाल्यावर पिंड ब्रह्मांड तथा अष्ट कमलांची सर्व शक्ती एका विशिष्ट केंद्रप्रभेने प्रकाशमान रहाते. ही ज्ञान आणि अनुभवाची अंतिम स्थिती आहे.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## त्याग हे यज्ञाचे खरे मर्म आहे

आधुनिक केसरी



सदाचरणाने राहणाऱ्या माणसाला खर्च कमी लागतो, कारण खऱ्या समाधानाने पोट भरले की अन्नही कमी लागते. मी हे वारंवार सांगतो, कारण सदाचरणाचे, नीतिधर्माचे आचरण, हा परमार्थाच्या इमारतीचा पायाच आहे. पाया भक्कम नसेल तर त्यावरची इमारत जास्त दिवस टिकू शकणार नाही. त्याप्रमाणे नीती जर सांभाळली नाही, तर पुढच्या कर्माचा फारसा उपयोग होत नाही. परस्त्री मातेसमान माना, परद्रव्याची अभिलाषा बाळगू नका आणि परनिंदेला विष्ठा समजून त्याग करा. या तीन गोष्टींना फार सांभाळा. परमार्थाची इमारत या तीन गोष्टींवर उभी करायची आहे. नुसता पाया बांधून ज्याप्रमाणे घरात राहता येत नाही, त्याप्रमाणे पायाशिवाय इमारतही उभी करता येत नाही. 'राम कर्ता' ही भावना ठेवून नामात राहणे, म्हणजे परमार्थरूपी इमारतीत आनंदात राहणेच होय. व्यावहारिक मोठेपणा बाजूला ठेवा आणि देवाला अनन्यभावाने शरण जा. देवाला शरण जाताना सर्व विसरून जा. समजा, एखादा माणूस नाटकात राजाचे काम करीत असला आणि नाटक संपल्यावरही तो घरी घेऊन जर राजासारखे वागू लागला, तर त्याचा सर्व व्यवहार बिघडून जाईल; त्याचप्रमाणे, देवाला शरण जाताना, मी मोठा भक्त, विद्वान्, पैसेवाला ही सर्व नाती विसरून गेले पाहिजे. कर्माचे फळ आपल्या हातचे नाही म्हणून त्याची काळजी करू नये, हे समजले तरी, काळजी न करणे हे देखील आपल्या हातचे नाही म्हणून आपण काळजी करतोच ! यासाठीच भगवंताच्या नामात राहण्याची सवय करा. कर्म करणे यात विशेष नाही. आपल्याला कर्म केल्याशिवाय चैनच पडत नाही. 'कर्म करा' असे गीतेतही सांगितले आहेच. परंतु कर्म केल्याने पाहिजे ते फळ आपल्याला मिळतेच असे नाही; म्हणून भगवंताला स्मरून कर्म करा, आणि मग काय काय होते ते पहा. तेच निष्काम कर्म. भगवंताच्या इच्छेने सर्व घडते आहे ही भावना ठेवून आपले कर्तव्य करणे, हे सर्व गीतेचे सार आहे. जो समजून त्याग करील त्याला फायदा होईल. नाहीतरी, संन्यास आणि त्याग दोन्ही आपल्याजवळसुद्धा आहेत. भगवंताच्या बाबतीत आपण संन्यासी वृत्ती धारण करतो आणि आपण आपल्या आईबापाला सोडतो असा त्याग करतो ! हे काय कामाचे ? त्याग हे यज्ञाचे खरे मर्म आहे. भगवंताच्या प्राप्तीच्या आड जे जे येते ते ते टाकणे, म्हणजे यज्ञ करणे होय. या यज्ञामध्ये वासनांची आहुती द्यावी. कोणत्याच गोष्टीबद्दल हवे अगर नको असे न वाटणे, हेच वासनांची आहुती दिल्याचे लक्षण आहे.

**२८१. जेथे वासना संपली तेथेच भगवंताची कृपा झाली.**

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, १ मार्च २०२४
adhunikkesari.com

# शिवछत्रपतींचे विचार लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी 'शिवपुत्र संभाजी' महानाट्याचे आयोजन : आ. नीलेश लंके

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** शिवछत्रपतींचे विचार समाजात तळागाळातील लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी शिवपुत्र संभाजी या स्वराज्याच्या छाव्याचा धगधगता इतिहास मांडणारे ऐतिहासिक महानाट्य शिवपुत्र संभाजी  ह्या महानाट्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती आ. निलेश लंके यांनी दिली. लोकनेते आ. निलेश लंके यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित शिवपुत्र संभाजी महानाट्याची माहिती देताना ते पत्रकारांशी बोलत होते. हे महानाट्य शुक्रवार ते सोमवार दररोज सायंकाळी सहा वाजता केडगाव रेल्वे पुलाजवळ आयोजित करण्यात आले आहे. सुमारे २ तास ४० मिनिटांचा हा कार्यक्रम आहे. या साठी १५० × २५० फुटाचे भव्य स्टेज उभारण्यात आले असून त्याची उंची १२० फूट आहे. भव्य किल्ल्याची उभारणी करण्यात आली आहे. या वेळी घोडे मैदानात पळताना दिसतील. सुमारे ६५ लाखाचा सेट उभारण्यात आला आहे. ४.५० लाखाची शस्त्रे बनविण्यात आलेली आहेत.३५० पेक्षा अधिक कलाकारांचा यामध्ये सहभाग असून ६०पेक्षा अधिक कलाकार स्थानिक असतील.८०हजार लोकांची बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. त्या मध्ये ६५००० खुर्च्या लावण्यात आले असून, ५ हजार लोकांसाठी  व्ही आय पी सोय करण्यात आली आहे. लोकांचा प्रतिसाद बघून या मध्ये वाढ होण्याची शक्यता गृहीत धरून तशी व्यवस्था करण्यात आली आहे. नगर शहरासह पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, राहुरी जामखेड, पाथर्डी, शेवगाव या ठिकाणी ११ लाखांपेक्षा अधिक पासेस चे वितरण समक्ष जाऊन सन्मानाने करण्यात आले आहे. हे काम करण्यासाठी ५ हजारापेक्षा अधिक कार्यकर्ते सहभागी झाले आहेत. या पत्रकार परिषदेसाठी डॉ. राहुल झावरेसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.







## विद्यार्थ्यांनी व्यावसायिक कौशल्ये विकसित करावी

आधुनिक केसरी न्यूज

**लक्ष्मण मडके**
**शेवगाव :** येथील न्यू आर्ट्स महाविद्यालयामध्ये वाणिज्य विभागामध्ये दि 29 रोजी पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते . या पालक मेळाव्यात विद्यार्थी आणि पालक यांनी विभागातील कार्य आणि विविध उपक्रम यांचे विशेष स्तुती केली. सादर मेळाव्यात विद्यार्थी आणि पालक प्रतिनिधी सौ. रोहिणी झिंजुर्के यांनी विद्यार्थिनी पुस्तकी ज्ञानाबरोबर सध्याच्या युगातील विविध व्यावसायिक कौशल्ये याचे अध्ययन आणि स्वीकार करून उद्योग व व्यापारी क्षेत्रात स्वतःची नवीन ओळख निर्माण करावी असे मत मार्गदर्शनातून व्यक्त केले. एखाद्या लहान व्यवसायाची सुरवात करून भविष्यातील प्रगतीचा आलेख त्यांनी उदाहरणासह व्यक्त केले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी स्वतःच्या क्षमतेवर आधारित आर्थिक विभागाचे स्तर निर्माण करावेत याविषयी सौ. लांडे मॅडम यांनी प्रतिपादित केले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. मंगेश राहिंज यांनी केले तर आभार वेदिका क्षीरसागर यांनी मानले.

## वैशिष्ट्यपूर्ण योजना अंतर्गत शेवगाव - पाथर्डी नगर परिषदच्या विविध विकास कामांसाठी 25 कोटींचा निधी : आ. मोनिकाताई राजळे

आधुनिक केसरी न्यूज

**लक्ष्मण मडके**
**शेवगाव :** महाराष्ट्र राज्य सरकारचे वैशिष्ट्यपुर्ण योजनेअंतर्गत शेवगाव नगरपरिषद व पाथर्डी नगरपरिषदेच्या विविध विकास कामांसाठी 25 कोटी रूपयांचा निधी प्राप्त झाला असल्याची माहिती शेवगांव - पाथर्डी विधानसभा मतदारसंघाच्या आमदार मोनिकाताई राजळे यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली. या निधीमुळे शेवगांव - पाथर्डी शहरांच्या विकास कामांना मोठ्या प्रमाणात चालना मिळणार आहे. सदरील विकास कामांसाठी आमदार मोनिकाताई राजळे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजपा चे नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे सतत पाठपुरावा केला होता. या मंजूर निधीमध्ये दोनही शहरातील कॉक्रीट रस्ते, बंदीस्त गटार, स्ट्रीट लाईटची कामे, पेव्हींग ब्लॉक, रस्ते खडीकरण डांबरीकरण, सभामंडप आदी कामांचा समावेश आहे.

या मंजुर कामांमध्ये शेवगांव नगरपरिषद अंतर्गतील वार्ड क्र. 16 येथे आहिल्याभवन सभागृह बांधणे रु. 20 लक्ष, मिरी रोड ते कारखेले घर पेव्हींग ब्लॉक बसविणे रु. 40 लक्ष, विद्यानगर येथे विठ्ठल-रुख्मीणी मंदिराजवळ प्रवेशद्वार बांधणे रु. 11 लक्ष, वृंदावन गार्डन ते मारुती मंदिर रस्ता कॉक्रीटीकरण



करणे रु. 30 लक्ष, वृंदावन गार्डन येथे आरओ प्लॅन्ट व सेड करणे रु. 12 लक्ष, पांडूरंग आश्रम गोशाळा पैठण रोड येथे सभामंडप बांधणे रु. 15 लक्ष, खंडु शिंदे निवास ते करवंदे निवास पर्यंत भुमीगत गटार बांधणे रु. 5 लक्ष, गोधणे डॉक्टर निवास ते परदेशी डॉक्टर निवास भुमीगत गटार बांधणे रु. 3 लक्ष, मिरी रोड ते विठ्ठल देवढे निवास रस्ता व भुमीगत गटार बांधणे रु. 25 लक्ष, संतोषी माता मंदिर शास्त्रीनगर येथे सभामंडप बांधणे रु. 15 लक्ष, जोशी घर ते दौंड घर रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे रु. 30 लक्ष, जोशी सर निवास ते शशि काळे निवास रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे रु. 15 लक्ष, मारुती मंदिर (मिळकत नं.4009) सभामंडप बांधणे रु. 15 लक्ष, प्रभाग क्र. 10 आयेशानगर येथे पेव्हींग ब्लॉक बसविणे रु. 30 लक्ष, वसंत लांडे निवास ते जोग निवास भुमीगत गटार बांधणे रु. 10 लक्ष, देशमुख निवास ते रविबापू पवार निवास भुमीगत गटार बांधणे रु. 5 लक्ष, स्ट्रीट लाईट फेज बसविणे रु. 80 लक्ष, श्रीराम कॉलनी येथील राजु कुसळकर घर ते राजु इंदे घर व गणपती मंदिर अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे रु. 25 लक्ष,  बॉम्बे मशिनरी स्टोअर्स ते लांडे वस्ती रस्ता कॉक्रीटीकरण करणे. रु. 100 लक्ष, आखेगांव रोड ते कोरडे वस्ती रस्ता कॉक्रीटीकरण करणे. रु. 80 लक्ष, म्हसोबानगर ते खालची वेस नाला गटार बांधकाम करणे. रु. 50 लक्ष, म्हसोबानगर ते खालची वेस रस्ता कॉक्रीटीकरण करणे. रु. 40 लक्ष, मिरी रोड (मारुती मंदिर) ते जिल्हा परिषद शाळा कर्डीले वस्ती रस्ता कॉक्रीटीकरण करणे 500 मीटर रु. 30 लक्ष,  स्वप्नील सुपारे निवास ते भैय्या सय्यद निवास रस्ता कॉक्रीटीकरण करणे रु. 40 लक्ष, सर्जे वस्ती ते ग्रामीण रुग्णालय रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे रु. 60 लक्ष, तेलंगी माता मंदिराजवळ सभामंडप बांधणे रु. 15 लक्ष, खुंटेफळ रोड ते बाळासाहेब गोरे घर रस्ता खडीकरण व मजबुतीकरण करणे रु. 10 लक्ष, आखेगांव रोड ते झिरपे घर निवास पेव्हींग ब्लॉक बसविणे रु. 15 लक्ष, मगर वस्ती ते नेवासा रोड खडीकरण डांबरीकरण करणे रु. 40 लक्ष, शेळके निवास ते हमसफर टेलर निवास पेव्हींग ब्लॉक बसविणे रु. 15 लक्ष  , महादेव देवस्थान (माळेगांव) समोरील जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणे रु. 40 लक्ष, तेलंगी माता मंदिर ते दिलीप डाके घर रस्ता खडीकरण व मजबुतीकरण करणे रु. 10 लक्ष, महालक्ष्मी जिनींग रोड ते विजय कोरडे घर रस्ता खडीकरण करणे रु. 10 लक्ष, मिरी रोड ते अर्जुनराव काळे घर (नेवासा रोड कडे) रस्ता कॉक्रीटीकरण करणे रु. 40 लक्ष या कामांचा समावेश आहे.

## सत्संगाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** संत निरंकारी मंडळाच्या वतीने



बाजार सावंगी येथे जिल्हास्तरावरील निरंकारी अध्यात्मिक सत्संग समारोहाचे आयोजन शनिवार ता:२ रोजी सायंकाळी सहा ते नऊ महाराष्ट्र सातारा झोनचे प्रचार क अविनाशजी जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजन करण्यात आले आहे. सदगुरु माता सुदिक्षा सविंदर हरदेव जी महाराजांचे महान प्रचारकांच्या अमृत वचनाचा लाभ भाविकांनी घ्यावा असे आवाहन सत्संग मुखी एसबी नलावडे यांनी केले आहे. सर्वांसाठीच्या महाप्रसादाचा लाभही घ्यावा.

## श्री तुळजाभवानी जिल्हा क्रीडा संकुल बनले तळीरामांचा अड्डा

### धाराशिव येथे याच मैदानावर होतोय "महासंस्कृती महोत्सव"

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**
**धाराशिव :** येथे तुळजाभवानी जिल्हा क्रीडा संकुल नावाने एकमेव मैदान आहे. या मैदानात बॅडमिंटन कोर्ट, हॉली बॉल, व्यायाम साहित्य व धावपट्टी व इतर सुविधा आहेत. पण मैदानाच्या सुरक्षेच्या कसल्याही उपाय योजना नाहीत. संध्याकाळनंतर जमणारा तळीरामांचा अड्डा, मैदानाच्या कडेने, सर्वत्र दारूच्या रिकाम्या बाटल्या आणि दारू पिण्यासाठी वापरलेल्या प्लास्टिकच्या ग्लासचा खच पडलेला आहे. तसेच मैदानात अनेक ठिकाणीं वेलींचा विळखा पाहायला मिळत आहे. क्रिडा संकुल गेट समोर खाजगी वाहनांच्या पार्किंग, येथेच उघड्यावर लोक लगेच लघुशंके साठी थांबतात त्यामुळे प्रवेशद्वारासमोरच पसरलेली दुर्गंधी परिसरात





असे चित्र असताना जिल्हा क्रीडा संकुल प्रशासनाचे मात्र याकडे दुर्लक्ष आहे. अशातच सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि धाराशिव जिल्हा प्रशासन, धाराशिव यांच्या समन्वयातून श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक वर्षानिमित्त महासंस्कृती महोत्सवाचे आयोजन २९ फेब्रुवारी ते ४ मार्च २०२४ पर्यंत याच तुळजाभवानी जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला तळीरामांकडून गालबोट लागू नये.पोलीस प्रशासनाने खबरदारी घेणे गरजेचे आहे.

## पवारांचे निमंत्रण

आधुनिक केसरी

बारामती नमो रोजगार मेळाव्याच्या निमित्ताने मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री येत्या शनिवारी बारामती दौऱ्यावर असणार आहेत. राष्ट्रवादीच्या फुटीनंतर पहिल्यांदाच मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बारामतीत एवढा मोठ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यादरम्यान एक मोठी माहिती समोर येत आहे. बारामतीत येणाऱ्या मुख्यमंत्र्यांना आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना शरद पवारांनी फोन करून त्यांच्या घरी जेवणाचे निमंत्रण दिले आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या विनंतीवरून येणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शरद पवारांचे निमंत्रण स्वीकारणार का हे पाहावे लागेल. बारामतीत शनिवारी शासकीय कार्यक्रम असतानाही, राज्यसभेचे खासदार असणाऱ्या शरद पवारांना या कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यात आले नाही. आता शरद पवारांनी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना त्यांच्या घरी जेवणाचे आमंत्रण दिले असताना ते आमंत्रण स्वीकारले जाईल का हे पाहावे लागेल. बारामतीमध्ये शरद पवारांचे घर असल्याने आणि राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री बारामतीत येणार असल्याने हे निमंत्रण देण्यात आल्याची माहिती आहे. बारामतीला जेव्हा कुणीही येते त्यावेळी शरद पवार हे आवर्जून त्यांना घरी बोलावतात, अथिती देवो भवः ही आमची संस्कृती असल्याचं खासदार सुप्रिया सुळे यांनी म्हटलंय. राज्याचे मुख्यमंत्री जर बारामतीला येत असतील तर त्यांना बोलावणे ही आमची संस्कृती असल्याचंही त्या म्हणाल्या. विद्या प्रतिष्ठान येथील 12 एकराच्या मैदानावर बारामती रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आलं आहे. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या अनेक महत्त्वाचे नेते उपस्थित असणार आहेत. मात्र या कार्यक्रमाला शरद पवारांना निमंत्रण देण्यात आले नसल्याची माहिती समोर आली आहे. येत्या 2 मार्च रोजी बारामतीमध्ये रोजगार मेळावा होणार असून त्या कार्यक्रमाला खासदार अमोल कोल्हे आणि वंदना चव्हाण यांनाही निमंत्रण देण्यात आले आहे. राज्यसभेचे खासदार असणाऱ्या शरद पवारांचे नाव मात्र वगळण्यात आल्याने त्यावर राजकीय चर्चा सुरू आहे. या कार्यक्रमाला खासदार सुप्रिया सुळे यांना निमंत्रण देण्यात आले आहे.

## लोकशाहीकडून धार्मिक भांडवलशाहीकडे



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**आम्ही भारताच्या लोकांनी लोकशाहीचा स्विकार करून प्रत्यक्षात लोकशाही २६ जानेवारी १९५० रोजी अमंलबजावणी सुरू केली. लोकशाही अर्थात प्रजासत्ताक म्हणजे सरळ सरळ प्रजा अर्थात लोकांचे सरकार. आम्ही दरवर्षी शासकीय पातळीवर २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन साजरा करतो. परंतु प्रजासत्ताक व्यवस्था येथे खरचं निर्माण झाली का याचा विचार विनीमय, समिक्षा करतो का? प्रजासत्ताक दिन साजरा करणे आणि राष्ट्रप्रजासत्ताक असणे यामध्ये खुप मोठा फरक आहे. आम्ही लोकशाही स्विकारून आता पंचेहत्तर वर्षे झाले आहेत. पंचेहत्तर वर्षात लोकशाही ची जाळेमुळे खऱ्या अर्थाने सर्वसामान्य लोकां पर्यंत पोहचले का चिंतेचा विषय आहे.**

अजूनही देशातील सुशिक्षित लोकांना लोकशाही चा अर्थ व गांभीर्य कळाले नाही. लोकशाहीचे समृद्ध फळे सर्व सामान्य लोकांना चाखता आली का? याचा प्रामाणिक विचार कोणी व कधी केला का? लोकशाही चे फायदे काय व ते लोकांना मिळाले का? असे अनेक प्रश्न लोकशाही पंचेहत्तर वर्षाची झाली असताना ही उपस्थित आहेत. लोकशाही चे म्हणजे देशातील असलेल्या सर्व व्यवस्था लोकांच्या हिताचे काम करतील. त्यामध्ये ग्रामपंचायत सचिवापासुन तर मंत्रालयीन सचिवापर्यंत, सरपंचापासुन तर प्रधानमंत्री पर्यंत सर्व जन लोक सेवक आहेत. यांनी लोकांची सेवा करणे अपेक्षित आहे. लोकांना वेगवेगळ्या माध्यमातून लोकहीताच्या योजना, जनतेचा सहभाग होऊन सामुदायिक विकासासाठी वेगवेगळे विभाग व त्यांचे कर्मचारी अधिकारी लोक सेवकच आहेत, सर्व शासकीय यंत्रणेचा मुख्य उद्देश जनतेची सेवा करून जनतेच्या अडचणी सोडवून जनतेला समृद्ध करून देशाच्या विकासाला हातभार लावणे हाच होय. परंतु लोकशाही ज्यांच्या मार्फत पेरण्याचे काम व्हायला पाहिजे होते त्याच लोकशाही च्या सेवकांनी घर भरण्याचे काम केले आहे. जनता वाऱ्यावर सोडून जनतेच्या वाट्याचे ज्याला खाता येईल त्याने खाण्याचा प्रयत्न केला. लोकशाही मध्ये लोककल्याण होण आवश्यक असताना लोकच समस्या ग्रस्त आहेत. वेगवेगळ्या माध्यमातून लोकांच्या हक्क अधिकार यांच्या वर मर्यादा आनुन जनतेला च वेठीस धरले जाते व जनतेच्या लुटारूंना मोकळे सोडले जाते. जनतेची लुट फक्त राजकारणीच करतात असे नाही. राजकारणी मोठ्या प्रमाणात करतात हे खरे असले तरी लोकांची प्रत्यक्ष लुट हि इतरांकडून ही होते. लोकांचे हक्काचे काम करण्यासाठी लोकांची आर्थिक पिळवणूक केली जाते, काही ठिकाणी जात बघुन ओळख बघुन काम केले जाते हे ही जनतेची लुटच आहे. भारताची लोकशाही जनमाणतात का जाऊ दिली नाही याचे सर्वात महत्वाचे कारण आहे ते म्हणजे भारतीय संविधान व लोकशाही ने प्रत्येक माणसाला समान संधी, सन्मान, हक्क अधिकार बहाल करून हजारो वर्षांपासून अज्ञानात खितपत पडलेल्या, विषमतावादी व्यवस्थेने जाणीव पुर्वक दूर्लक्षीत ठेवलेल्या समुहाला सुद्धां राजा बनवले. आणि हीच गोष्ट हजारो वर्षांपासून स्वतः ची व्यवस्था स्थापन करून लोकांचे शोषण करणाऱ्यांना पचली नाही. संविधाना अगोदर देशात लोक एवढे विद्वान आणि व्यवस्था एवढी संस्कारक्षम होती की माणसाच्या सावलीचा बाट होत होता, माणसासोबत जेवन, बसने उठने दुरच बोलनेही पाप वाटत होते. लोकांना लोकांच्या पाऊल खुनांचाही बाट होत होता. सार्वजनिक ठिकाणी कुत्रे, गायी, बैल म्हैस यांना वावरता येत होते पण माणसाला बंधी होती. असे गलिच्छ व तुच्छ विचार असलेल्या लोकांनी आपली व्यवस्था निर्माण केली होती. हीच व्यवस्था संविधानाने उधळून लाऊन समता, बंधुता, समान न्याय, संधी सार्वजनिक संपतीचा समान उपभोग हे सर्व बहाल केल्याने विषमतावादी व मेंदु नसलेल्या लोकांचे महत्त्व कमी झाले नाही परंतु त्यांच्या सोबत इतर आले आणि हेच दुखणे सहन होत नाही म्हणून लोकांना लोकशाही व संविधान कळूच दिले गेले नाही. संविधानाने प्रत्येक माणसाला विषेश महत्व देऊन जात धर्म यावरून भेदभाव व विषमता संपुर्ण पणे नाकारली आहे. धर्म ही प्रत्येकाची खाजगी बाब असून प्रत्येकाला प्रत्येकाच्या धर्मानुसार आचरण व उपासना करण्याचा अधिकार आहे. लोकांचे कल्याण करण्यासाठी, कल्याणाचे निर्णय घेण्यासाठी, लोकांचे प्रश्न मांडून उपाय शोधण्यासाठी देश पातळीवर संसद व राज्य पातळीवर राज्य विधीमंडळ आहे. प्रत्येक नागरिकांच्या समस्या सोडवणे, मांडणे हे याच ठिकाणी होते. म्हणजे राज्य विधीमंडळ व संसद हे जनतेच्या कल्याण करणारे आणि कोणताही भेद नसलेले महत्वाचे ठिकाण आहेत. मताधिकाराच्या माध्यमातून येथे जनतेचे प्रतिनिधी जनतेच्या वतीने समस्या मांडून त्या दुर केल्या जातात. परंतु सध्या लोकशाही ला पायदळी तुडवून लोकांना धर्माच्या नावावर लढवले जाते व धर्मांचे भांडवल करून त्यातून निवडणुक घेतली जाते. धर्मांधता आणि भांडवलशाही लोकशाही साठी घातक असते. भारतात तर एवढी कठीण परिस्थिती निर्माण करून ठेवली की लोकांना धर्मांध तर बनवलेच पण धर्माला भांडवल बनवून राजकीय सत्तेची झोळी भरून घेतली जाते. आणि धार्मिक स्थळांचे भांडवल बनवून विशिष्ट लोकांच्या हजारो पिढ्यांच्या कमाईचे साधन उपलब्ध करून दिले जाते. सर्व सामान्य मानुस धर्माच्या नावासाठी काहीही करायला तयार आहे. कारण त्याला रोजच एकच ऐकवले जाते की धर्म धोक्यात आहे. परंतु शिक्षण, आरोग्य, नोकरी आणि इव्हिएमच्या माध्यमातून लोकशाही धोक्यात आहे याबद्दल कधीच प्रबोधन होऊ दिले जात नाही. सरकारचे चुकीचे ध्येय धोरणे, शिक्षण, रोजगार, इव्हिएम आणि लोकांना धर्मांध बनवून एकाच जातीच्या लोकांच्या पिढ्यानपिढ्या च्या कमाईला विरोध करणारे लोक धर्मांध लोकांना धर्म विरोधी वाटतात. शिक्षण, रोजगार, आरोग्य यावर खर्च करायला पैसे नसलेल्या देशात हजारो करोडोचे मंदिर उभे राहतात, हजारो करोडो रूपये जाहिरात वर खर्च केले जातात आणि पुजारी व ट्रस्टीच्या शंभर पिढ्याचे कल्याण केले जाते. लोकशाही मध्ये सार्वजनिक मालमत्ता ह्या सर्वांच्या मालकीच्या असतात. सत्तेत असलेल्या लोकांनी त्यांचे संवर्धन करणे आवश्यक असते. परंतु सार्वजनिक संसाधन जर विकसित झाले तर देशातील शेवटचा घटकही तेवढाच मालक असणार जेवढा की देशाचा प्रधानमंत्री असेल. म्हणून तळागाळातील, संख्येने कमी, शिक्षणाने कमी व सामाजिक विकासापासुन दुर ठेवलेल्या लोकांना देशातील संपतीचा फायदा होऊन त्यांचे कल्याण होऊच नाही म्हणून सार्वजनिक संपत्ती खाजगी कंपनीला विकुन देशाला भिकेला लावले जात आहे. सार्वजनिक क्षेत्रातील संपती विकुन त्यामधून आलेल्या पैशाचा फायदा मोजक्याच एकाच वर्णातील लोकांना होत आहे. संविधाना अगोदर बोलण्याचा, शिक्षणाचा, मत व्यक्त करण्याचा, सार्वजनिक ठिकाणी जाण्याचा, सार्वजनिक संपतीचा उपभोग घेण्याचा अधिकार नसताना आम्हाला संविधानाच्या माध्यमातून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाचे मालक बनवले. सर्व सामान्य मानुस देशाच्या मालक बनलेले हेच अजूनही काही लोकांच्या पचनी पडणारे नाही म्हणून प्रत्येक मानसाच्या जिवनाचे सोने करणारे संविधान आणि त्याच संविधानाने दिलेली लोकशाही आहे. परंतु यांचे गांभीर्य व महत्व संविधान विरोधी लोकांनी सर्वसामान्य लोकांना कधी कळूच दिले नाही. लोकांना संविधानाचे महत्व कळून जेव्हा कळेल की प्रत्येक जन या देशाचा मालक आहे. सार्वजनिक संपतीवर सर्वांचा सारखाच हक्क आहे, आणि लोकांचे कल्याण करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे संविधान आहे. त्या दिवशी देशात क्रांती होईल. त्या दिवशी लुटारू राजकीय नेत्यांचे धर्मांचे भांडवल काम करणार नाही. परंतु विषमतावादी लोक सध्या तरी लोकशाही ला चुकीच्या पद्धतीने नेऊन धर्माच्या नावावर लोकांना भावनिक बनवून धर्माचा वापर राजकीय झोळी व पुजाऱ्याची झोळी भरून घेण्यासाठी करत आहेत. संविधानाचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते की संविधान कितीही चांगले असले आणि ते राबणारे लोक जर योग्य नसतील तर संविधानाचा उपयोग होणार नाही. आज तीच परिस्थिती आली आहे. हजारो वर्षापासून अंधविश्वास, अज्ञान, काल्पनिक कथा, अनिष्ट रुढी परंपरा यांच्या माध्यमातून मानसिक गुलाम बनलेल्या लोकांना संविधानाने शिक्षण, नोकरी, हक्क अधिकार, विज्ञान, समान संधी देऊन जिवनाचे सोन करून सोन्यापेक्षा जास्त महत्त्व माणसाला निर्माण करून दिले. आमदार खासदार, मंत्री राष्ट्रपती बनवले. प्रत्येकांच्या मानसिक स्वांतत्र्याचा व प्रगतीचा एकमेव मार्ग म्हणजे संविधान, संविधानाला पंचेहत्तर वर्षे पुर्ण होत आहेत अमृतमहोत्सव येऊनही संविधाना प्रती व लोकशाही प्रती लोकांचा उत्साह दिसुन येत नाही. कारण लोकशाही ला दाबुन धार्मिक भांडवलशाही उदयास आली आहे. सर्व सामान्य लोकांचा वापर करून पुजाऱ्यांचे पोट भरण्याचे काम सतत होत असते. शासकीय नियम आहे औपचारिकता म्हणून प्रजासत्ताक दिन साजरा केला जातो. बऱ्याच लोकांना प्रजासत्ताक दिन साजरा करताना भारतीय संविधान व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नावही घेण्याची लाज वाटते. कारण आजही हजारो वर्षाचे चुकीचे संस्कार असलेले व मानसाला माणूस न समजणारे लोक खुप आहेत. ते.लोक खुप मोठ्या संख्येने असले तरीही सर्व सामान्य जागृत व्यक्तीला स्वाभिमान, सन्मानाने आणि स्वतः चे परखड व स्पष्ट मत मांडण्याचा, सरकारच्या चुकीच्या ध्येयधोरणावर बोलण्याचा, धर्म खाजगी बाब आहे परंतु काही लोक जाणीव पुर्वक सार्वजनिक ठिकाणी धर्माची मांडणी करत असतील तर त्याला विरोध करण्याचा, आणि देशभर एक भारतीय मिरण्याचा अधिकार संविधानाने दिलेला आहे. आणि धार्मिक भांडवलशाहीचे स्तोम माजत असताना संविधानाने दिलेले मुलभूत अधिकार हे शस्त्र म्हणून काम करत आहेत. म्हणून विषमतावादी लोकांनी लोकशाही ची कीतीही तोडफोड करण्याचा प्रयत्न केला तरी ही जागृत लोकांनी मात्र लोकशाही व संविधाना बद्दल प्रबोधन करणे कमी करू नये हिच अपेक्षा. ज्यांना बोलण्याचा, लिहण्याचा, नोकरी करण्याचा, निवडणूक लढण्याचा, मताधिकार बजावण्याचा, वडील व पतीच्या संपतीत वाटा माघण्याचा, कुठेही फिरण्याचा, प्रसुती रजा घेण्याचा, मंदिर,संसद, गार्डन, सिनेमागृह, हॉटेल मध्ये जाण्याचा, धर्माच्या नावावर घोषणा देण्याचा, पूजा अर्चा करण्याचा, धार्मिक स्थळांमध्ये जाण्याचा जो अधिकार आहे तो फक्त आणि फक्त भारतीय संविधान व त्याचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळेच. म्हणून वरिल संविधानाच्या लाभार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाच्या सदिच्छा.

## विश्वासाहर्ता हे जीवन आभूषण आहे



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**दैनंदिन जीवन जगत असताना आपली विश्वासार्हता हि आढळ असली पाहिजे आणि आपली विश्वासार्हता जीवनभर ढळणार नाही जीवनातील सर्व श्रेष्ठ अशी जबाबदारी असते. विश्वासाहर्ता म्हणजे नेमकं काय हे जाणून घेण्याच्या द्दष्टीने आरंभी सत्य युग नंतर त्रेतायुग,द्ववपार युग या कालखंडातील सामाजिक जीवन आणि साध्याच्या कलियुगातील सामाजिक जीवन या मधील बारीक सारीक घटनाक्रम घडामोडी,मानवी वृत्ती यांचं तुलनात्मक मुल्यमापन केल्यानंतर आपसुकच आपल्याला जाणवेल की विश्वासाहर्ता हि मानवी जीवनातील अमुल्य आणि उत्कृष्ट अशी संपदा आहे असं म्हटलं तरी वा्वग ठरणार नाही.**

कलियुगातील सुरवातीच्या काळात असणार सामाजिक जीवन व सध्याच्या विद्यमान परिस्थितीत मधील समाजिक जीवन यामधील आचरण व वर्तन या मध्ये खुप मोठी विश्वासार्हततेची प्रचंड मोठी पोकळी निर्माण झालेली जाणवत आहे. आणि याचे परिणाम स्वरूप म्हणुन मानवी जीवनातील दैनंदिन आचरण व वर्तनात अमुलाग्र बदल होत असून दिवसेंदिवस विश्वासाहर्ता संपुष्टात येत आहे कमी होत आहे. नैतिकतेचा अभाव निर्माण झाल्यामुळे त्याचे अनेक दुरगामी परिणाम होऊन विश्वासाहर्ता ढासळत चालली आहे व त्याचे मानवी जीवनावर होत असलेले परिणाम म्हणजे माणुस माणासांशी माणुस म्हणून माणसा सारखा वागायला तयार नाही आणि पृथ्वीवरील इतर जी जीव सुष्टी आहे त्या मुक्या प्राण्यांवर सुद्धा आणि वेगवेगळ्या पद्धतीने अन्याय करत आहेत.पर्यायाने निसर्गाच्या संतुलनावर याचा विपरीत परिणाम होत आहे सामाजिक राजकीय सांस्कृतिक आर्थिक क्षेत्र कोणतही असो त्या क्षेत्रात कार्यरत असणारा माणुष्य आणि दिवसेंदिवस वाढत चाललेली,माणसाची स्वार्थी ,लोभी, दुष्ट वृत्ती, निर्माण होऊन अंहकार वाढीस लागला आहे त्याचा परिणाम मोह,माया वाढली असून नितिमता ढासळत चालली आहे त्याचे परिणाम म्हणून विश्वासाहर्ता कालयुगात चिंतेचा विषय बनली आहे. विश्वासाहर्ता गुण शब्द कलियुगात तसा दुर्मिळच झाला आहे सत्ययुग,त्रेतायुग,द्वापार युग इत्यादी कालखंडातील सामाजिक जीवनाचे अध्यायन केले तर प्रत्येक व्यक्ती च्या जीवनात सगळ्यात महत्व पुर्ण गुण म्हणजे विश्वासाहर्ता अगदी त्या युगात जे जे युद्ध महायुद्ध झाले ते पण युद्ध निति धर्म न्याय नियमांचे पालन करुन झाले कारण विश्वासाहर्ता गुण त्या युगा तील माणसाचं अभुषण होत आणि त्या युगाची नेमकी ओळख ठळकपणे सांगायची म्हटलं तर विश्वासाहर्ता युग म्हटलं तर वावगं ठरणार नाही परंतु आता जे युग चालू आहे ज्याची ओळख कालयुग आहे त्या मध्ये मात्र विश्वासाहर्ता हा गुण क्वचित आणि तुरळक लोकांच्या जीवनात दिसतो ज्या मुळे जीवनात आपल्याला जो मान आपमान,सन्मान, त्रिरसकार , आदरभाव ,दुजाभाव , तसेच इतरांकडून आपल्याला मिळणारी चांगली,वाईट वागणूक आपल्या विश्वासाहर्ता वर अंवलबुन आहे.म्हणून जीवनात काही कमवायचे असेल तर विश्वासाहर्ता हा सद्‌गुण कमवा जो पिढ्यानपिढ्या टिकून राहील आज हजारो वर्षे उलटून गेले तरी आपण आपल्या देशात जे महापुरुष सिद्ध पुरुष होऊन गेले त्यांच नाव आपण आज देखील आदर्श म्हणुन आदरपूर्वक घेतो.कारणं त्यांनी आपल्या जीवनात प्रचंड विश्वासाहर्ता मिळवली म्हणून वार्या च्या गतीने त्यांची किर्ती दही दिशेला पोहचली सज्जनांची किर्ती वार्या हाती माप म्हणून म्हणून विश्वासाहर्ता हा गुण जीवनात जोपासला पाहिजे परंतु आज जी सामाजिक परिस्थिती झपाट्याने रसातळाला जात आहे.आणि स्वार्थ वृत्ती,लोभ,अंहकार, मोह ,द्वेष,ढसाळती निति मता यामुळे माणुसकी संपुष्टात येऊ लागली आहे.आणि मानवी वृत्ती असुरी वृत्ती प्रमाणे आचरण करत आहे.या सगळ्या मध्ये खूप कमी लोक विश्वासाहर्ता टिकवुन आहेत ज्या मुळ पृथ्वी वर समतोल टिकून आहे.म्हणून जीवनात काही मिळो ना मिळो विश्वासाहर्ता निर्माण झाली म्हणजे सर्व उत्कृष्ट संपदा अर्जित झाली पाहिजे . निश्चितच सगळ्यात मोठे समाधान देणारी बाब आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandare. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# चंद्रपुरात तीन दिवसीय ताडोबा महोत्सव

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. शाम हेडाऊ**

**चंद्रपूर :** महाराष्ट्रातील सर्वात लोकप्रिय व्याघ्र प्रकल्प आणि 90 पेक्षा जास्त वाघांचे निवासस्थान असलेल्याताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातर्फेवन्यजीव संरक्षण, शाश्वत पर्यटन आणि स्थानिक वारसा यांना चालना देण्यासाठी तीन दिवसीय ताडोबा महोत्सवाचे आयोजनकरण्यातआले आहे. सुधीर मुनगंटीवारवने, सांस्कृतिक कार्य आणि मत्स्यव्यवसाय मंत्री, महाराष्ट्र यांनी काल मुंबईत ताडोबा महोत्सव-2024 ची घोषणा केली. वनसंरक्षक आणि ताडोबाचे क्षेत्र संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर यांनी आज चंद्रपूर येथे या महोत्सवाची सविस्तर माहिती दिली. दोनशेहून अधिक वाघांचा अधिवास असलेल्या आणि वाघांची भूमी म्हणून प्रसिद्ध असलेल्या चंद्रपूरमधील विविध ठिकाणी 1 ते 3 मार्च 2024 या कालावधीत हा भव्य महोत्सव होणार आहे. वन्यजीव सद्भावना दूतआणि चित्रपट अभिनेत्री रवीना टंडन या उद्घाटन समारंभाला विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. तीन दिवस चालणाऱ्या या महोत्सवात वन्यजीव संवर्धनावर चर्चासत्र, स्थानिक ते राष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धा, छायाचित्रांचे प्रदर्शन, कवीसंमेलन आणि जागतिक कीर्तीच्या कलाकारांचे सांस्कृतिक कार्यक्रम अशा विविध कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. या महोत्सवात विविध क्षेत्रांतील मान्यवर सहभागी होणार आहेत. ताडोबा महोत्सव आयोजित होत असतानाच माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' मधील त्यांच्या ताज्या भाषणातवन्यजीव संरक्षण आणि मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी AI तंत्रज्ञान वापरल्याबद्दल ताडोबाचे कौतुक केले. "चंद्रपूर जिल्ह्यातील मानव आणि वाघ यांच्यातील संघर्ष कमी करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेची मदत घेतली जात आहे," असे माननीय पंतप्रधानांनी नमूद केले. "त्यांनी केलेली प्रशंसा ही वन्यजीव संवर्धनाप्रतीच्या आमच्याअतूट बांधिलकीचे कौतुक आहे", असे डॉ. रामगावकर यांनी पत्रकार परिषदेतसांगितले. महाराष्ट्राचे वने, सांस्कृतिक कार्य आणि मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, "ताडोबा महोत्सव शाश्वत विकासाला चालना देत आपला नैसर्गिक वारसा जतन करण्याच्या आमच्या वचनबद्धतेचा पुरावा आहे. हा कार्यक्रम केवळ वन्यजीव संरक्षणाचे महत्त्व स्पष्ट करत नाही, तर वन्यजीवांबरोरबरच्या सहजीवनाची स्थानिक ग्रामस्थांची महत्वपूर्ण भूमिकादेखील अधोरेखित करतो. जबाबदार पर्यटन पद्धतींना प्रोत्साहन देऊन आणि सर्वांनी संवर्धनाच्या प्रयत्नांमध्ये सहभागी करुन, आम्ही केवळ आमच्या मौल्यवान परिसंस्थांचेच रक्षण करत नाही, तर स्थानिकांसाठी आर्थिक प्रगतीच्या संधीही निर्माण करतो. एकत्रित प्रयत्नांमधूनआपण एक निरामय वातावरण तयार करू शकतो, जिथे वन्यजीवांना संरक्षित निवासस्थान मिळेल आणि स्थानिक समुदायांचीही भरभराट होईल.




ताडोबा महोत्सवाच्या आयोजनामागील उद्देश ताडोबाला मोठ्या प्रमाणावर जागतिक पातळीवर पुढे आणणे हा ताडोबा महोत्सवाचा मुख्य उद्देश आहे. या महोत्सवाला अनेक परदेशी पाहुणे येणार आहेत. यामध्ये विविध देशांच्या वाणिज्य दूतावासातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. जगभरातील मिस वर्ल्ड स्पर्धकही ताडोबा महोत्सवाला भेट देऊन 'वाघ वाचवा' हा संदेश देणार आहेत. ३ मार्च हा जागतिक वन्यजीव दिन म्हणून साजरा केला जातो. वन विभागताडोबा महोत्सव-2024 दरम्यान जागतिक वन्यजीव दिन साजरा करत आहे. या अनुषंगाने वन्यजीव संरक्षणापुढील आव्हानांवर चर्चा करण्यासाठी चर्चासत्रे आणि परिसंवाद आणि जनजागृतीसाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचा स्थापना दिवसही ताडोबा महोत्सवदरम्यान साजरा केला जाणार आहे. ताडोबा राष्ट्रीय उद्यानाची स्थापना 1955 मध्ये झाली. तीन दशकांनंतर 1986 मध्ये अंधारी अभयारण्य घोषित करण्यात आले. पुढे 1995 मध्ये ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाची निर्मिती झाली आणि वाघांना त्यांचे हक्काचे घर मिळाले. आज, सस्तन प्राण्यांच्या 80 प्रजाती आणि पक्ष्यांच्या 280 प्रजाती एकूण 1,727 चौरस किलोमीटर (यात625 चौरस किलोमीटर कोर जंगल आहे) परिसरातपहायला मिळतात.वन विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या समर्पित प्रयत्नांमुळे, PROJECT TIGER लाराज्यात उल्लेखनीय यश मिळाले आहे. या यशात ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचा मोठा वाटा आहे. आजच्या घडीला चंद्रपूर जिल्ह्यात दोनशेहून अधिक वाघ आहेत. ताडोबाचे हे यश साजरे करणे, हा देखील ताडोबा महोत्सवाच्या आयोजनामागचा एक प्रमुख उद्देश आहे.

दिवस पहिला कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी, विविध सत्रे आणि प्रदर्शन आयोजित करण्यात येणार आहेत. सुरुवातीस ग्राम परिस्थितिकी विकास समितीचे सदस्य,सरपंच आणि उपसरपंच यांची मानव-प्राणी संघर्ष कमी करण्याबाबत चर्चा आणि निसर्ग प्रश्नमंजुषा होणार आहे. संध्याकाळीभव्य उद्घाटन सोहळ्यात पारंपारिक नृत्य, स्वागतपर भाषणे, लघुपट आणि श्रेया घोषाल यांची संगीतसंध्या सादर होणार आहे.

# वडोद बाजार परिसरात अवकाळी

## पावसामुळे गहू, हरभरा पिकाचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद बाजार परिसरात काढण्यात आलेल्या हरभरा व गव्हाच्या पिकाचे अवकाळी पावसामुळे नुकसान झाले आहे सोमवारी रात्री नऊ वाजता अचानक अवकाळी पावसाचे झाल्याने शेतकऱ्याच्या शेतात काढणीस आलेल्या गव्हाच्या व हरभऱ्याच्या पिकाचे नुकसान झाले आहे वडोद बाजार परिसरात अल्पशा पावसावर शेतकऱ्यांनी गहू हरभरा पिकाची पेरणी केली होती काही ठिकाणी गव्हाचे व हरभरा चे पीक हे काढणीस आले आहे सकाळी पावसामुळे काढण्यात आलेल्या गव्हाचे पीकाचा रंग भुरकट होणार आहे ढगाळ वातावरणाच्या परिणामामुळे पावसामुळे गव्हाच्या मळणीसाठी , हार्वेस्टर च्या दर वाढणार आहे तर काही ठिकाणी हुरड्यात गव्हाचे पीक वादळी वाऱ्यासह पाऊस मुळे आडवे झाले आहे. अचानक आलेल्या पावसामुळं शेतकऱ्याची एकच धांदल उडाली काही शेतकरी अपल्ल्या शेतात आसलेल्या मक्का पिकांची गंजी झाकण्यासाठी ताडपत्री , प्लास्टिक घेवून शेतात धावत होते.. तर काही शेतकऱ्याची मक्का,तुर. शेतात या अवकाळी पावसात भिजली य अवकाळी पावसामुळे शेतकऱ्याचे शेतातील पिकांचे नुकसान झाले आहे तर अल्प शेतकऱ्यानी ठिंबक सिंचनावर लागवड केलेल्या बाजरी, मक्का पिकाला पावसाचा फायदा झाला आहे.



# बाजार सावंगी प्रा.आ. केंद्रात, राष्ट्रीय मानसिक आरोग्य शिबीराचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात जिल्हा सामान्य रुग्णालय चिकलठाण छत्रपती संभाजी नगर व जिल्हा परिषद आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२६सोमवारी भव्य राष्ट्रीय मानसीक आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. शिबीरात विविध मानसिक रोगा संदर्भात माहिती देण्यात आली. तर आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ अंजुम निलोफर यांना प्रमाणपत्र देण्यात आला.याप्रसंगी संबंधित वैद्यकीय अधिकारी, सरपंच आप्पाराव पाटील नलावडे, उपसरपंच कारभारी नलावडे, वैद्यकीय अधिकारी डॉ अंजुम निलोफर सह सर्व आरोग्य कर्मचारी, उपस्थित रुग्ण ,नागरिक ,महिला उपस्थित होत्या.






# लोहटा पश्चिम शाळेत राष्ट्रीत विज्ञान दिन

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लोहटा पश्चिम येथे 28 फेब्रुवारी हा थोर शास्त्रज्ञ चंद्रशेखर व्यंकट रामण यांनी प्रकाशाच्या विकिरणासंबंधी "रामन परिणाम" हा शोध 28 फेब्रुवारी1928 ला लावला त्या शोधाच्या स्मरणार्थ असणारा 28 फेब्रुवारी हा राष्ट्रीय विज्ञान दिन आज साजरा करण्यात आला. या प्रसंगी विज्ञान प्रयोग सादरीकरण प्रदर्शनाचे उद्घाटक मुख्याध्यापक संगीत अनपट यांनी केले. विज्ञान शिक्षक संतोष लिमकर यांनी राष्ट्रीय विज्ञान दिनाची व वैज्ञानिक दृष्टिकोन कसा अंगी बाळगावा याची माहिती विषद केली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या विज्ञान प्रयोगाचे सादरीकरण केले. जलशुद्धीकरण पद्धत सोहम अडसूळ व सुरज अडसूळ, पाण्याला आग लागणे - साहिल झोंबडे व सार्थक सावंत, वस्तुमान मोजणे बालाजी बिटके, ज्वलणासाठी ऑक्सिजनची आवश्यकता- मयुरी ठाकर, गौरवी ठाकर, सिद्धी कदम, कार्बनडाय ऑक्साईड ज्वलनास विरोध करतो- समर्थ पवार, श्रेयश कोळी ,श्रीकृष्णा अडसूळ, ज्वालामुखी -सृष्टीअडसूळ, हिंदवी सावंत . स्थितिस्थापकता- अमृता नाईकनवरे पाण्याचा पुष्टीयताण- शिवकन्या पवार. वजन व माप- गीतांजली पांचाळ, विद्युत निर्मिती- कृष्णा पांचाळ .पाण्याचा पुष्टीयताण - आर्या पवार, माहेश्वरी चव्हाण. हवेचा दाब -अक्षरा शिंदे, पूजा अडसूळ.या विद्यार्थ्यांनी प्रयोगाचे सादरीकरण केले. वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याचा निर्धार करण्यात आला. याप्रसंगी शिक्षक विजयकुमार कोठावळे, गोविंद टेळे ,प्रतिभा पवार व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# आदर्श इंग्लिश स्कूल कळंबचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, आदर्श इंग्लिश स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले या संमेलनात एकूण 25 कला सादरीकरण करण्यात आले. यात गाणे, पोवाडे, ड्रामा,कीर्तन अशा विविध कलागुणांचे प्रदर्शन विद्यार्थ्यांच्या कडून करण्यात आले विद्यार्थ्यांना त्यांच्या अंगी असणाऱ्या सुप्त गुणांना वाव देण्याच्या उदांत हेतूने आदर्श इंग्लिश स्कूल नेहमीच नाविन्यपूर्ण उपक्रम करत असते.

यात चिमुकल्यांच्या शैक्षणिक सहली, विज्ञान प्रदर्शन,चित्रकला, क्रीडा, मनोरंजन अशा विविध गुणात्मक संधी विद्यार्थ्यांना प्राप्त करून देण्याचे काम आदर्श इंग्लिश स्कूल कळंब करत असते यावर्षी या वार्षिक स्नेहसंमेलनाचे तेरावे वर्ष होते. या प्रसंगी शिक्षिका, कर्मचारी वतीने कार्यक्रमाचे स्वागत गीत गाण्यात आले. संस्थेची कार्याध्यक्ष आदरणीय गणेश सर, संस्थेच्या प्रशासकिय अधिकारी सुरेखा ताई करंजकर यांच्या प्रयत्नाने हे कार्यक्रम यशस्वी झाला. या कार्यक्रमासाठी शिक्षक कोरिओग्राफर यांचे कार्य देखील मोलाचेच आहे. कार्यक्रमाचे प्रस्ताविक संस्थेचे अध्यक्ष प्रा. नवनाथ शंकरराव करंजकर यांनी केले. यावेळी त्यांनी मागील तेरा वर्षाचा क्रमवार पद्धतीने तपशील सर्वांसमोर मांडला. त्याच बरोबर कार्यक्रमाचे अध्यक्ष हनुमंत तात्या



मडके यांनी गुणवत्ता ही सुरुवाती पासूनच असावी, जेणेकरून विद्यार्थ्यांचा पाया पक्का होईल विद्यार्थी हे लहान गटाचे असल्यामुळे यांच्या शिकवने काठीन काम आहे. विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रातही आपले नाव उंचवावे . या कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ .सुशीलकुमार ढेगळे यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमात साठी प्रमुख पाहुणे सौ,सीमा संभाजी कोळी या पुणे येथून आपल्या ग्रामीण भागातल्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे कौतुक पाहण्यासाठी आल्या आणि त्यांच्या कडून कौतुकाची थाप शाळेला मिळाली. या कार्यक्रमाचे आभार संस्थेचे सचिव ज्ञानेश्वर तोडकर यांनी मांडले.

# अमृत भारत रेल्वे स्टेशन योजनेअंतर्गत रोटेगाव स्टेशनचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** आज देशातील 550 रेल्वे स्थानकांचे अमृत भारत स्टेशन योजने अंतर्गत आपग्रेडेशन च्या कामांची, 1500 ओहर ब्रिजेस आणि अंडर पास च्या कामांचे भूमिपूजन आणि अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत काम पूर्ण झाले आहे अश्या मराठवाड्यातील 4 रेल्वे स्थानकांचा लोकार्पण सोहळा एकाच वेळी ऑनलाइन पद्धतीने आज पार पडला . या अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत रोटेगाव रेल्वे स्थानकाचा समावेश झाला आहे . या योजने अंतर्गत 11.663 कोटी रुपये खर्चून रोटेगाव रेल्वे स्टेशन मध्ये सुविधा पुरवण्यात येणार आहे . यात प्रवाशांसाठी असलेल्या प्रतिक्षालय सुख सुविधांमध्ये वृद्धी करणे. दिव्यांग प्रवाशांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देणे . लिफ्ट बसविणे, रेल्वे प्लॅटफॉर्मच्या पुर्ण लांबी पर्यंत अच्छादनाने झाकणे, दर्शनी भागाचा आधुनिक पद्धतीने आकर्षक विकास करणे, दिर्घ कालिन विकासाचा मास्टर प्लॅन लक्षात घेऊन आवश्यक ते सर्व सुख सुविधा उपलब्ध करणे. रेल्वे स्टेशन



सोबत परिसराचाही विकास करणे , इत्यादी बाबी अमृत स्टेशन योजनेअंतर्गत रोटेगाव रेल्वे स्टेशन येथे करण्यात येणार आहेत. आज रोटेगाव रेल्वे स्टेशन वर पार पडलेल्या या उद्घाटन समारोह प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा. संजयजी खंबायते, जिल्हा अध्यक्ष दक्षिण ग्रामीण संभाजीनगर हे उपस्थित होते.तर प्रमुख अतिथी म्हणून डॉक्टर दिनेश जी परदेशी जिल्हा सरचिटणीस व विधानसभा निवडणूक प्रमुख वैजापूर यांच्या समवेत एकनाथ रावजी जाधव प्रदेश कार्यकारणी सदस्य, अनंतजी बोरकर भाजपा रेल्वे प्रकोष्ट मराठवाडा अध्यक्ष, प्रल्हादजी पारटकर सहसंयोजक, इत्यादी मान्यवर हजर होते.

या प्रसंगी आपल्या अध्यक्षीय समारोप भाषणात जिल्हाध्यक्ष संजयजी खंबायते म्हणाले कि, गेल्या 10 वर्षांमध्ये भाजपा सरकारने देशाच्या सर्वांगीण विकासावर मोठ्या प्रमाणावर भर दिला आहे . त्याचाच एक भाग म्हणून आज देशाभरातील 554 रेल्वे स्थानकांचे अपग्रेडेशन आणि एक हजार पाचशे ओव्हर प्लीज आणि अंडर बिजनेस च्या कामांचे उद्घाटन होत आहे . जगाच्या पाठीवर एकाच वेळी इतक्या मोठ्या प्रमाणावर विकास कामांची सुरुवात होण्याचे हे पहिलेच उदाहरण आहे. आजच्या या कार्यक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये होणार आहे असे प्रतिपादनही श्री खंबायते यांनी केले. याप्रसंगी डॉक्टर दिनेश परदेशी, एकनाथ, जाधव, अनंत बोरकर आणि दामोदर पारिक यांची समायोचित भाषणे झाली. या कार्यक्रमासाठी केंद्रीय अर्थ व राज्यमंत्री मा . भागवतजी कराड साहेब यांनी पाठविलेला शुभ संदेश जिल्हाध्यक्ष संजय जी खंबायते यांनी वाचून दाखविला. या कार्यक्रमास संदीपजी ठोंबरे जिल्हा संयोजक सोशल मीडिया भाजपा दशरथजी बनकर जिल्हा अध्यक्ष भाजपा ओबीसी मोर्चा प्रशांतजी कंगले जिल्हाध्यक्ष भाजपा व्यापारी आघाडी विजयजी नलावडे रेल्वे पोस्ट संभाजीनगर जिल्हा ग्रामीण अध्यक्ष सौ जयमाला ताई वाघ जिल्हा महिला आघाडी अध्यक्ष भाजपा , ज्ञानेश्वर जी जगताप जिल्हा उपाध्यक्ष भाजपा दिनेश राजपूत भाजपा शहर अध्यक्ष प्रेम जी राजपूत जिल्हा उपाध्यक्ष विशाल जी संचेती चेअरमन डी मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँक बळीरामजी शिंदे सरपंच रोटेगाव वसंत मतसागर सरपंच अघूर , दामोदर पारिक रेल्वे प्रकोष्ट स्टेशन समिती अध्यक्ष , निलेश पारख रेल्वे स्टेशन समिती उपाध्यक्ष , अजय आहेर सरचिटणीस स्टेशन समिती, गौरव डोळे स्टेशन सहसचिव स्टेशन समिती सदस्य विठ्ठल सावळे गणेश पहाडी, विनोद भाटिया, ज्ञानेश्वर आदमाने, दादासाहेब कराळे, खंडेराव शिंदे, मधुकर कोयले, राजेंद्र तोष्णीवाल, कैलास लोखंडे, नाना गुंजाळ तसेच दक्षिण मध्य रेल्वेचे ए डि आर एम राजेंद्र मीणा, चीफ वेल्फेअर इन्स्पेक्टर रवींद्रजी गायकवाड, सीनियर डीसीएम विजय कृष्ण इत्यादी पदाधिकारी व नागरिक व विद्यार्थी व महिला मोठ्या संख्येने हजर होते .

असेच कार्यक्रम मराठवाड्यात भोकर, मानवतरोड, हिमायत नगर येथे ही पार पडलेत, तसेच मराठवाड्यात 175 रोड ओव्हर ब्रिज व अंडर पास चे उद्घाटन ही एकच वेळेस पार पडलेत.



# वर्षा कबाडी यांना शिक्षकरत्न पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** दोस्ती फाउंडेशन अहमदनगर यांच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय शिक्षकरत्न पुरस्कार वर्षा कबाडी यांना प्रदान करण्यात आला. मराठी राजभाषा दिनानिमित्त राज्यस्तरीय बालकुमार काव्यसंमेलन आयोजित करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्रसिद्ध कवी धोंडीरामसिंह रजपूत होते. शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था महाराष्ट्र राज्य सहसंचालक रमाकांत काठमोरे,शिक्षण विस्तार अधिकारी रवींद्र कापरे, पोलिस उपनिरीक्षक शमुवेल गायकवाड, ज्येष्ठ साहित्यिक सुभाष सोनवणे, प्रसिद्ध साहित्यिक प्रशांत वाघ, प्रा. दादासाहेब भोईटे, मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी, रज्जाक शेख, देविदास बुधवंत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. वर्षा कबाडी या सेवा शिक्षण मंडळाच्या श्रीनाथ विद्या मंदिर वसंतटेकडी अहमदनगर या शाळेत सहशिक्षिका पदावर कार्यरत आहेत. त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना शिक्षकरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मुख्याध्यापिका अनिता सिद्दम,माजी उपायुक्त रामकिसन देशमुख, शंकर कबाडी, मंगल देशमुख,तुषार देशमुख,राहुल देशमुख, प्रा.सविता देशमुख, मंजुश्री देशमुख यांनी वर्षा कबाडी यांचे अभिनंदन केले आहे.

# जिल्ह्यात 1 लक्ष 55 हजार 435 बालकांना पोलिओ डोस देण्याचे उद्दिष्ट

## जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आरोग्य यंत्रणेचा आढावा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** दोन थेंब प्रत्येकवेळी.... पोलिओ वर विजय दरवेळी' या संकल्पनेनुसार रविवार दि. 3 मार्च रोजी पल्स पोलिओ मोहीम संपूर्ण जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. यासाठी जिल्ह्यातील 0 ते 5 वयोगटातील 1 लक्ष 55 हजार 435 बालकांना पोलिओ डोज देण्याचे उद्दिष्ट आहे. या मोहिमेच्या पूर्वतयारीबाबत जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी आज (दि.28) आढावा बैठक घेतली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. ललित पटले, माता बाल संगोपन अधिकारी डॉ. प्राची नेहुलकर, जागतिक आरोग्य संघटनेचे सर्व्हिलन्स मेडीकल ऑफिसर डॉ. साजिद, जिल्हा सार्वजनिक आरोग्य विभागाच्या परिचारिका सुरेखा सुपराळे, सुरेखा ठाकरे आणि भावना सोंडवल आदी उपस्थित होते. याप्रसंगी जिल्हाधिकारी विनय गौडा म्हणाले, पल्स पोलिओ लसीकरणापासून 0 ते 5 वयोगटातील एकही बालक वंचित राहता कामा नये. बाहेरून स्थलांतरीत झालेले नागरिक किंवा वस्त्यांवर विशेष लक्ष द्यावे. जेथे लसीकरण कमी होते, अशा ठिकाणांना आरोग्य विभागाच्या अधिका-यांनी प्रत्यक्ष भेटी देऊन जनजागृती करावी. तालुकास्तरावरही कार्यालय प्रमुखांनी लसीकरण मोहिमेबाबत बैठक घेऊन योग्य नियोजन करावे, अशा सुचना जिल्हाधिका-यांनी दिल्या.

भारतात एकही पोलिओग्रस्त रुग्ण आढळणार नाही, याकरीता यावर्षीसुध्दा शासनातर्फे पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेची एकच फेरी दिनांक 3 मार्च 2024 रोजी राबविण्यात येत आहे. या दिवशी 0 ते 5 वर्ष वयोगटातील सर्व बालकांना बुथवर पोलिओ लस पाजण्यात येणार आहे व 100 टक्के बालकांना लसीकरण करण्याचे उद्दिष्ट हे.

जिल्ह्यात 2349 लसीकरण केंद्रे व 262 मोबाईल टीम : पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेत ग्रामीण भागात 2117 लसीकरण केंद्रे, शहरी भागात 88 व महानगरपालिका क्षेत्रात 144 अशी एकूण 2349 लसीकरण केंद्रे स्थापन करण्यात करण्यात आली आहेत. या व्यतिरीक्त प्रवासात असलेल्या बालकांना, स्थलांतरीत होत असलेल्या बालकांना व निवासाची व्यवस्था नसलेल्या बालकांना पोलिओ लस मिळावी याकरीता ग्रामीण भागात 190 मोबाईल टिम, शहरी भागात 21 व महानगरपालिका क्षेत्रात 51 अशा 262 मोबाईल टिमची व्यवस्था केलेली आहे. तसेच टोलनाका, बसस्टॉप, रेल्वेस्टेशन, यात्रास्थळे या ठिकाणीसुध्दा ट्राझिंट टिमव्दारे लसीकरणाची व्यवस्था केलेली आहे. भारत 2011 पासून पोलिओ मुक्त : पोलिओ रोगाचे निर्मुलन करण्याचे हेतुने भारत सरकार 1995पासून पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबवित आहे. तसेच नियमित लसीकरण, ए.एफ.पी. सर्व्हेक्षण व पोलिओ रुग्ण आढळल्यास मॉप अप रॉउंड याव्दारे पोलिओ रुग्णांच्या संख्येत लक्षणीय घट झालेली आहे. देशात 13 जानेवारी 2011 नंतर अद्यापपर्यंत पोलिओचा एकही रुग्ण आढळलेला नाही. पोलिओ निर्मुलन कार्यक्रमाची सुरुवात झाल्यापासुन प्रथमच अशा पध्दतीने यश मिळालेले आहे. जानेवारी 2014 मध्ये भारताला पोलिओ निर्मुलन प्रमाणपत्र मिळाले आहे.



# अतिक्रमणाविरोधात वाहतूक पोलीस व मनपाची संयुक्त कारवाई

## २० दुचाकी वाहने जप्त; गाळेधारकांना नोटीस

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** शहरात रस्त्यावर अतिक्रमण करून वाहने विक्री करणाऱ्यांवर वाहतूक पोलीस व चंद्रपूर महानगरपालिकेद्वारे संयुक्त कारवाई करण्यात आली असुन जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील रस्त्यावर जुनी वाहने विक्रीचा व्यवसाय करणाऱ्यांची २० दुचाकी वाहने जप्त करण्यात आली आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील महत्त्वाच्या मार्गावर अतिक्रमण, जुनी चार चाकी दुचाकी वाहने विक्री करण्याची दुकाने अवैधरित्या थाटण्यात येतात. दुकानासमोर पार्किंग करणाऱ्या नागरिकांची वाहने थोड्या वेळापुरती वाहने दुकानासमोर उभी राहतात मात्र विक्री करणाऱ्यांची वाहने पुर्ण वेळ रस्त्यावर उभी राहतात यामुळे या अतिक्रमणांचा वाहतुकीला अडथळा निर्माण होतो तसेच फुटपाथवरही अतिक्रमण होत असल्याचे लक्षात घेऊन २० दुचाकी वाहने जप्त करण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे काही दुकानदारांनी आपल्या दुकानासमोर पत्र्याचे शेड लाऊन फुटपाथवर अतिक्रमण केले असल्याचे आढळुन आल्याने त्यांचे अतिक्रमण जेसीबी द्वारे काढण्यात आले असुन काही गाळेधारकांना गाळे सील करण्याबाबत अंतिम सूचना देण्यात आल्या आहेत. रोडवरील जे जुनी चार चाकी व दुचाकी विक्री करणारे स्थायी दुकानदार आहेत त्यांनी आपल्या दुकानासमोर कोणतेही वाहन विक्रीकरिता लावु देऊ नये,वाहन विक्री करावयाची असल्यास विक्रीकरिता स्वतः जागा उपलब्ध करून घेण्याचे आवाहन चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे. सदर कारवाई उपायुक्त अशोक गराटे यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणात सहायक आयुक्त सचिन माकोडे,सहायक आयुक्त संतोष गर्गेलवार,वाहतुक पोलीस निरीक्षक प्रवीण पाटील,उपप्रादेशिक परिवहन अधिकारी,अतिक्रमण निर्मुलन अधिकारी राहुल पंचबुद्धे तसेच मनीष शुक्ला,अनिल खोटे, भरत बिरिया, बंडू चहरे विक्रम महातव,डोमा विजयकर,अमरदीप साखरकर यांनी केली.



# राष्ट्रीत विज्ञान दिन पाथर्डी शाळेत उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाथर्डी येथे 28 फेब्रुवारी हा थोर शास्त्रज्ञ चंद्रशेखर व्यंकट रामण यांनी प्रकाशाच्या विकिरणासंबंधी "रामन परिणाम" हा शोध 28 फेब्रुवारी1928 ला लावला त्या शोधाच्या स्मरणार्थ असणारा 28 फेब्रुवारी हा राष्ट्रीय विज्ञान दिन आज साजरा करण्यात आला. या प्रसंगी विज्ञान प्रयोग सादरीकरण प्रदर्शनाचे उद्धाटन सरपंच नानासाहेब पिंगळे, ग्रामसेवक नवनाथ खाडे मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड यांनी केले. विज्ञान शिक्षक धनंजय गव्हाणे यांनी राष्ट्रीय विज्ञान दिनाची व वैज्ञानिक दृष्टिकोन कसा अंगी बाळगावा याची माहिती विषद केली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या विज्ञान प्रयोगाचे सादरीकरण केले. विद्यार्थ्यांनी प्रयोगाचे सादरीकरण केले. वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याचा निर्धार करण्यात आला. या प्रसंगी शिक्षिका मनिषा पवार, सुरेखा भावले, सरोजिनी पोते व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.



# एमयूएसएसमध्ये महाराष्ट्रातून सीएसएमएसएसचा डंका

## बीएएमएस हिवाळी परीक्षेत पवार, लगड यांना चार सुवर्णपदके

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** शैक्षणिक गुणवत्तेला सर्वोच्च प्राधान्य देऊन आर्थिक सुदृढता आणि विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध सुविधा अधिक दर्जेदार करून विश्वासार्ह ओळख निर्माण करून देणाऱ्या कांचनवाडी, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित आयुर्वेद महाविद्यालय आणि रुग्णालयाचे कु. नमिता गुंडू पवार व कु. अश्विनी रेवणनाथ लगड या दोन विद्यार्थिनीने चार सुवर्णपदकं मिळवून महाराष्ट्र राज्यात प्रथम येण्याचा मान मिळवला. त्यांचा सत्कार संस्थेच्या विश्वस्त सौ. लता मुळे यांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावेळी सचिव श्री.पद्माकरराव मुळे, विश्वस्त समीरभैय्या मुळे यांची प्रमुख उपस्थिती होती. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या हिवाळी-२०२२ मध्ये घेण्यात आलेल्या अंतिम वर्ष बीएएमएस परीक्षेत विद्यार्थिनी कु. नमिता गुंडू पवार या विद्यार्थिनीने विद्यापीठातुन प्रथम येण्याचा मान म्हणुन "कै. पं. वैद्यराज ज्वालाप्रसादजी शर्मा शास्त्री भीषगाचार्य सुवर्णपदक" ०१ सुवर्ण तसेच श्रीमती. अन्नपूर्णा महादेवराव लखपती सुवर्णपदक" व "कै. हरिभाऊ गबाजी निकम सुवर्णपदक" शल्यतंत्र विषयात ०२ सुवर्ण असे एकूण ०३ सुवर्ण पदक पटकावले आहे. तसेच अंतिम वर्ष बीएएमएस परीक्षेत कु. अश्विनी रेवणनाथ लगड या विद्यार्थिनीने "ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक आबासाहेब लहानकर स्मृती सुवर्णपदक" शालाक्यतंत्र या विषयात ०१ सुवर्ण पदक पटकावले आहे. त्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष रणजित मुळे, प्राचार्य डॉ. श्रीकांत देशमुख, उपप्राचार्य डॉ. जयश्री देशमुख, डॉ. नरेश निंबाळकर, बाबासाहेब प्रधान, विभागप्रमुख, अध्यापक व कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.



सर्वप्रथम महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकमध्ये महाराष्ट्रातून मला सर्वाधिक तीन सुवर्ण पदक मिळाले आहे. त्याचे सर्व श्रेय माझे आई, वडील व CSMSS आयुर्वेद महाविद्यालयाला देईन. कारण आज मी जे काही यश मिळवलं ते यांच्यामुळे. डॉ. श्रीकांत देशमुखसर आणि टीम यांनी जी जिद्द, सातत्य, काहीतरी नवीन करण्याची संधी आम्हाला उपलब्ध करून दिली होती, खरे तर हेच माझे प्रेरणास्थान होते. त्याच्याकडून मी या गोष्टी शिकले. **नमिता गुंडु पवार**

मी अतिशय गरीब कष्ट करणाऱ्या शेतकरी कुटूंबातून आलेली असून काबाडकष्ट करणारे आई, वडील, भाऊ आणि डॉ. श्रीकांत देशमुख व संपूर्ण टीम यांचा देखील आदर्श घेण्यासारखाच आहे. कोणती ही गोष्ट म्हणजे अकॅडेमिक, स्पोर्ट्स व योगा यामध्ये सर्वानी आम्हाला खूप मेहनत, सर्व तसेच मदत केली. त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहे.
**अश्विनी रेवणनाथ लगड**



# 'अक्षरवेल'मधील कविता हे परिवर्तन लढ्याचे प्रभावी शस्त्र : डॉ. शोभा रोकडे

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** 'अक्षरक्रांती फाऊंडेशन'तर्फे नुकतेच नागपूर येथील टिळक पत्रकार भवन सभागृहात 'अक्षरवेल' या प्रातिनिधिक कवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळा उत्साहात पार पडला.

सर्वप्रथम सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष व ज्येष्ठ साहित्यिक मा. बबन सराडकर यांच्या हस्ते 'अक्षरवेल'चे प्रकाशन झाले. अध्यक्षीय भाषणातून ते म्हणाले की, 'अक्षरवेल हा कवितासंग्रह प्रातिनिधिक असला तरीही पहिलेपणाच्या खुणा यात कुठेही दिसत नाहीत. त्यामुळे या संग्रहातील कवी - कवयित्रींना उज्ज्वल भवितव्य आहे. अक्षरवेलमध्ये उद्याचे सुरेश भट, मधुकर केचे दडलेले आहेत. या कवींना भविष्यात राज्यपुरस्कार मिळतील, साहित्य अकादमीचे पुरस्कार मिळतील...यासाठी माझ्या शुभेच्छा आहेत'. अमरावतीच्या लेखक, कवयित्री व समीक्षक डॉ. शोभा रोकडे यांनी अक्षरवेलवर भाष्य करताना, 'मराठी भाषेचे लावण्य व मोठेपणा साकारणाऱ्या या संग्रहातील कविता गुणात्मक मूल्ये सांभाळणाऱ्या असून संपादकांचे आत्मभान, समाजभान व रसिकभान किती जागृत आहे; याची प्रचिती हा संग्रह देतो. विषय, आशय व अभिव्यक्ती या तीनही सूत्रांची मोहक गुंफण या कवितांमध्ये साधली गेली असून ह्या कविता विविधांगी विभ्रम अधोरेखित करतात. समाजाला उजेडतं ठेवण्याचा वसा या कवितांनी घेतला असून या काव्यसंग्रहाने अत्यंत उंचीची व सकस वाङ्.मयीनमूल्ये जोपासणारी महत्त्वाची कविता समाजाला दिली आहे. प्रातिनिधिक काव्यसंग्रहसुध्दा इतका दर्जेदार असू शकतो; ही अनुभूती हा संग्रह देतो. यासाठी संपादक शंकर घोरसे व कार्यकारी संपादक प्रभाकर तांडेकर 'प्रदत्त' यांनी घेतलेले परिश्रम अभिनंदनीय असून 'अक्षरवेल'हा संग्रह परिवर्तनाच्या लढ्याचे प्रभावी शस्त्र ठरणार आहे'; असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. निशा सोनेकर-बिजलेकर यांनी भरतनाट्यम नृत्यातून गणेश वंदना सादर केली. कवितासंग्रहातील दिवंगत कवी स्व. बाळकृष्ण राऊत यांना आदरांजली वाहिली गेली. रजनी पारधी यांच्या सुमधुर आवाजातील शारदा स्तवनाने रसिक-श्रोते मंत्रमुग्ध झाले. प्रास्ताविकतेत कार्यकारी संपादक व ज्येष्ठ साहित्यिक प्रभाकर तांडेकर 'प्रदत्त' यांनी संग्रहाच्या निर्मितीची पार्श्वभूमी विशद केली. अक्षरक्रांती फाऊंडेशनचे अध्यक्ष तथा संग्रहाचे संपादक शंकर घोरसे यांनी संपादकीय मनोगतात संग्रहाच्या मुखपृष्ठ व पाठ्यपृष्ठाचे विश्लेषण केले. प्रकशन सोहळ्याचे सुत्रासंचालन डॉ. पद्मिनी घोसेकर यांनी केले; तर ज्ञानपथ पब्लिकेशनचे सचिन सुकलकर यांनी आभार मानले. याप्रसंगी द्वितीय सत्रात ज्येष्ठ कवी गणेश भाकरे यांच्या अध्यक्षतेखाली कवीसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ साहित्यिक डॉ. वासुदेव डहाके व विशेष उपस्थिती म्हणून परळी वैजनाथ येथील सुप्रसिद्ध साहित्यिक 'मुक्तविहारी' हे पाहुणे म्हणून हजर होते. एकूण पस्तीस कवी-कवयित्रींनी एकापेक्षा एक सरस कवितांचे रंगतदार सादरीकरण केले. श्रोतृवर्ग कवितेच्या रंगात पूर्णपणे न्हावून निघाला. कवितांना खूप दाद दिली. कवीसंमेलनाचे बहारदार सूत्रसंचालन सुप्रसिध्द कवयित्री मंजूषा कऊटकर यांनी केले तर आभारप्रदर्शन कवयित्री विद्या निनावे यांनी केले. रजनी पारधी यांच्या पसायदानाने कार्यक्रमाचा समारोप झाला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता लीलाधर दवंडे, सुशील सुकलकर, वंदना घोरसे, विजय वासाडे, मोहन सोमलकर, निकिता गावंडे, सुचिता पिल्लेवार यांनी अथक परिश्रम घेतले.

# खेड बुद्रुक येथे सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** खेड बुद्रुक येथील जि.प.प्रा. केंद्र शाळा येथे विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या कलेतून मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला. विद्यार्थ्यांनी विविध गाण्यावर नृत्य करत आनंद लुटला. तसेच मान्यवर आणि पालकांकडून सुध्दा विशेष दाद मिळाली. या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून अक्षय दत्तात्रय बनसोडे हे होते. तसेच अध्यक्ष स्थानी शाळा व्यवस्थापन व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्तात्रय धायगुडे हे होते. कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी खेड बु! ग्रामपंचायतचे सरपंच गणेश धायगुडे पाटील, लोणंद कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा खेड बु! ग्रामपंचायत सदस्य नारायण दादासो धायगुडे पाटील, ग्रामपंचायत सदस्य सुभाष ठोंबरे,व सर्व ग्रामपंचायत सदस्य/सदस्या कर्मचारी वृंद, विद्यमान चेअरमन बजरंग मासाळ,व्हा.चेअरमन बाळासो निवृत्ती रासकर,सर्व संचालक मंडळ,माजी चेअरमन किसन धायगुडे पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्तात्रय धायगुडे,शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा सुप्रिया रासकर, रेश्मा धायगुडे, पवन धायगुडे, सलीम मुजावर, रोहीदास व्हटकर,व सर्व शाळा व्यवस्थापन समिती,जि.प.प्रा.केंद्र शाळेचे केंद्र प्रमुख रवींद्र ठोंबरे, माळी सेवा संघाचे तालुकाध्यक्ष सुनिल रासकर, माजी मुख्याध्यापक शिवाजी सोळस्कर, येळेवाडी शाळेचे मुख्याध्यापक संजय धायगुडे,दादासो हाके, युवा उद्योजक अतुल भाऊसो धायगुडे, युवा नेते अतुल व्हटकर, माजी सरपंच, उपसरपंच, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर,खेड बु! गावातील शासकीय/प्रशासकीय क्षेत्रात कार्यरत असणारा अधिकारी वर्ग व युवा वर्ग बहुसंख्येने उपस्थित होते. यावेळी अक्षय दत्तात्रय बनसोडे यांनी जि.प.प्रा.केंद्र शाळेतील विद्यार्थ्यांना भोजन करण्यासाठी २५० स्टील ची ताटे भेट म्हणून दिली. या कार्याबद्दल अक्षय बनसोडे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. ग्रामस्थ,ग्रामपंचायत व शाळा व्यवस्थापन समितीने विशेष कौतुक करत आभार मानले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सुनीता साबळे यांनी केले तसेच स्वागत मुख्याध्यापिका सुनिता भोईटे, संगीता काटकर यांनी केले. तसेच रामचंद्र गाढवे यांनी आभार मानले. विद्यार्थ्यांची वेशभूषा व तयार करण्यासाठी मंगल हाके यांनी मेहनत घेतली.

# नसरापूर येथे जुने वडाचे झाड कोसळले

आधुनिक केसरी न्यूज

**नसरापूर :** तालुक्यातील नसरापूर येथे वेल्हे - नसरापूर मार्गावर मुख्य बाजारपेठ रस्त्यालगत जुने झाड कोसळले असून झाड कोसळल्याने काही काळ वाहतूक कोंडी झाल्याचे दिसून आले. नसरापूर येथील सिद्धिविनायक हॉस्पिटल परिसरातील अनेक वर्षांचे जुने वडाची झाड आहेत. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र महावितरणच्या वीज वाहिनी खांबांचे तसेच तारांचे मोठे नुकसान झाले. घटनेची माहिती कळताच महावितरणचे कर्मचारी कैलास मोहिते, रोहिदास रावलं, कैलास भोई, तसेच वन विभागाचे कर्मचारी तांबे सर पगडे सर, नसरापूर ग्रामपंचायत सदस्य सुधीर वाल्हेकर, माजी ग्रा स ज्ञानेश्वर झोरे, इरफान मुलांनी घटनास्थळी दाखल झाले. नसरापूर गाव चे स्थानिक नागरिक प्रज्योत कदम यांनी जेसीबी मशीन उपलब्ध करून दिल्याने झाड हटविण्यात आले. तर कांबरे खेबा गावचे तरुण दीपक शिंदे व संतोष शिंदे यांच्या सतर्कतेमुळे तीन मुलींना वाचवण्यात यश आल्याचे स्थानिकांनी सांगितले. कांबरे गावचे पोलीस पाटील सुमित कांबळे यांनी



सतर्कता दाखवल्याने मोठा अनर्थ टळला आहे. नसरापूर परिसरात मुख्य रस्त्यालगत अनेक वर्षांची जुनी झाड असून परिसरातील नवीन गृहनिर्माण सोसायटयांमधील कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची सोय नसल्याने सोसायटी मधील नागरिक रात्री च्या वेळी रोड लागत जुन्या झाडांच्या परिसरात कचरा टाकत आहेत. परिणामी रस्त्यावर टाकलेला टाकत स्थानिक नागरिक त्याला त्या कचऱ्याचा त्रास होतो म्हणून पेटवल्याने झाडांचे नुकसान होत असल्याने अश्या दुर्दैवी घटना घडत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. कचरा टाकणाऱ्यांवर ग्रामपचायत नसरापूर ने कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरिक कित्येक वर्ष झाले करीत आहेत.

# स्व. किसनराव सदार विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**शंकर सदार**

**रिसोड :** खडकी सदार येथील स्व. किसनराव सदर विद्यालयांमध्ये वर्ग दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभाचा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्व विद्यार्थी शाळेच्या प्रांगणामध्ये बसविण्यात आले, त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रमुख पाहुणे आणि मार्गदर्शक व इतर मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.या निरोप समारंभाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.श्री संजू भाऊ सदर (अध्यक्षः- स्व.किसनराव सदर विद्यालय खडकी सदार) तसेच प्रमुख पाहुणे संदीप भाऊ सदर (सचिवः- संत ज्ञानेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ खडकी सदार) तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री जाधव सर (मुख्याध्यापकः-स्व.किसनराव सदर विद्यालय खडकी सदार श्री मानवतकर सर (मुख्याध्यापकः- जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा खडकी सदार) श्री गाडे सर व प्रमुख उपस्थितीमध्ये श्री शिंदे सर श्री गव्हाणे सर व श्री शिवाजीराव सुरोशे हे उपस्थित होते. विद्यालयाच्या वतीने कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर वर्ग दहावीच्या विद्यार्थ्यांनी आपला शाळेतील शेवटचा दिवस तसेच या शाळेमध्ये काय काय शिकायला मिळाले त्याविषयी त्यांनी त्यांचे अनुभव आपल्या भाषणांमधून व्यक्त केले.विद्यार्थ्यांनी खूप छान असे अनुभव आम्हा सर्वांसमोर मांडले. त्यानंतर कार्यक्रमाचे मार्गदर्शक श्री मानवतकर सर यांनी विद्यार्थ्यांना पुढील जीवनासाठी मोलाचे मार्गदर्शन केले. शिक्षण घेऊन काहीतरी बनवून दाखवा असे आव्हान सुद्धा त्यांनी विद्यार्थ्यांना केले तर श्री गाडे सर यांनी आपल्या मार्गदर्शनामधून विद्यार्थ्यांना संस्कार न विसरण्याचा सल्ला दिला व येणाऱ्या बोर्ड परीक्षेला समोर जाताना करावयाची तयारी याविषयी सखोल मार्गदर्शन केले तसेच श्री गव्हाणे सर शिंदे सर व श्री जाधव सर यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून येणाऱ्या बोर्ड परीक्षेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री संजू भाऊ सदार यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणांमधून विद्यार्थ्यांना त्यांची कर्तव्य जबाबदारी याची जाणीव करून देत येणाऱ्या परीक्षेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वर्ग नववीची विद्यार्थिनी तृप्ती संदीप सदार हिने केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री बकल सर यांनी केले शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री वाठोरे सर यांनी केले.हा कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी श्री वायाळ सर श्री फुपाटे सर श्री खडसे सर श्री मार्कड सर व श्री कोरडे सर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमानंतर सर्व विद्यार्थी व प्रमुख पाहुणे यांच्या भोजनाची सुद्धा व्यवस्था करण्यात आली होती.अशा प्रकारे स्व. किसनराव सदर विद्यालयांमध्ये निरोप समारंभाचा कार्यक्रम पार पडला.

# संतांना शरण गेलो तरच आपला उद्धार होतो

## ह.भ.प. उमेश महाराज दशरथे : पिंपळगाव उज्जैनी येथे अखंड हरिनाम सप्ताह

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** संतांच्या चरणी माथा टेकवून नतमस्तक होऊन त्यांना त्यांना साष्टांग दंडवत केला तर आपली सर्व दुःख दूर होतात. अंतःकरणातील प्रेम भाव वाढतो. काया बहरते, आणि आपला उद्धार होतो. पूर्व पुण्याई मुळेच संतांची सेवा घडते म्हणून आपण संतांना शरण गेले पाहिजे असे आवाहन ह.भ.प. वाणी भूषण उमेश महाराज दशरथे यांनी केले.

परम पूज्य गुरुवर्य हरिभाऊ महाराज पाटील यांच्या नवव्या पुण्यतिथीनिमित्त पिंपळगाव उज्जैनी ग्रामस्थांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या फिरत्या नारळी अखंड हरिनाम सप्ताहाच्या कीर्तनाचे पहिले पुष्प गुंफताना ते बोलत होते. ह. भ. प. श्रीगुरु मारुती महाराज तुणतुणे शास्त्री, ह.भ. प. गणेश महाराज पाटील, ह.भ.प. दत्तात्रय महाराज वाघ, पै. शिवाजीराव चव्हाण, सरपंच भगवानराव आढाव पाटील, नाथाभाऊ चव्हाण, बाळासाहेब वाघ यांच्यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थ, महिला व युवक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



संत तुकाराम महाराजांच्या गाथेतील श्री संताचिये माथा चरणावरी, साष्टांग हे करी दंडवत, विश्रांती पावलो सांभाळा उत्तरी, वाढले अंतरी प्रेम सुख, डौरली ही काया, कृपेच्या ओरसे, नोहे अनारसे उद्धरलो, तुका म्हणे मज न घडता सेवा, पूर्व पुण्य ठेवा ओढवला, हा चार चरणांचा अभंग त्यांनी कीर्तन सेवेसाठी निवडला होता.

संतांची प्रार्थना करणाऱ्या अभंगात संत तुकाराम महाराज म्हणतात की, आपण हाती घेतलेले कुठलेही कार्य निर्विघ्नपणे पार पडावे म्हणून, आपण संतांच्या चरणी लीन होतो. कारण देवाचे जसे मंगल आचरण आहे तसेच संतांचे देखील मंगल आचरण आहे. जसे देव मंगल स्वरूप आहेत तसेच संत सुद्धा मंगल स्वरूप आहेत. म्हणून आपण संताना शरणागती गेले पाहिजे. संत विवेकाने प्रसाद देतात. मात्र अशा संतांना आपण ओळखले पाहिजे. संतांकडे रूपाचंही सौंदर्य आहे आणि गुणाचही सौंदर्य आहे. संतांच्या चरणी नतमस्तक होऊन त्यांना शरण गेलो तर आपला उद्धार होणार याची शाश्वती आहे. ज्या अर्थी संत भेटले त्याअर्थी सेवा घडलीच असे समजावे. अशा शब्दात त्यांनी या अभंगाचे निरूपण केले. आपल्या कीर्तनात त्यांनी रामायण महाभारतातील अनेक दृष्टांत दिले.

ह.भ. प. गुरुवर्य हरिभाऊ महाराज पाटील यांनी महाराष्ट्रात अनेक थोर विद्वान संत घडवले. त्यांच्या धार्मिक आणि अध्यात्मिक कार्याची व्याप्ती महाराष्ट्रभर पसरलेली आहे. खेड्यापाड्यात त्यांनी एकपाठी निष्ठा निर्माण केली. म्हणूनच तर त्यांना सामान्य लोकांतही प्रतिष्ठा मिळाली आणि विद्वानातही प्रतिष्ठा मिळाली असे ते म्हणाले.

या कीर्तनाला मृदंगाचार्य ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज नंधानकर, पंढरीनाथ महाराज कराळे, गायनाचार्य भजन सम्राट अंकुश महाराज कोठुळे, संगीत विशारद संजय महाराज हजारे यांनी संगीत व गायन साथ केली. सरपंच भगवान आढाव यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह, वारकरी पंचा व श्रीफळ देऊन ह.भ.प.उमेश महाराज दशरथे व अन्नदाते गोविंद वाघ, दत्तात्रय मोरे व बाळासाहेब वाघ यांचा सत्कार करण्यात आला. नाथा चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. पै. शिवाजीराव चव्हाण यांनी आभार मानले. किर्तनानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम झाला.

# मोलखेडा जि. प. केंद्रशाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी इंगळे, उपाध्यक्षपदी गवर

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मोलखेडा येथील जिल्हा परिषद



प्राथमिक शाळेच्या शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी अतुल भागवत इंगळे तर उपाध्यक्षपदी गोपाळ दामू गवर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मुख्याध्यापक अवधूत सर यांच्या अध्यक्षतेखाली दि.२६/२/२०२४ रोजी या शैक्षणिक वर्षातील पहिली पालक सभा आयोजित करण्यात आली. या सभेत विविध समित्या गठित करण्यात आल्या. यावेळी २०२३-२४ ते २०२५-२६ या दोन वर्षांच्या कार्यकाळासाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी अतुल इंगळे उपाध्यक्षपदी गोपाळ गवर् यांची निवड करण्यात आली. शिक्षक-पालक संघाच्या अध्यक्षपदी मुख्याध्यापक अवधूत सरयांची निवड करण्यात आली. शालेय पोषण आहार व परिवहन समितीचीही स्थापना करण्यात आली. यावेळी विद्यार्थिनींचे अभिनंदन करण्यात आले. नूतन अतुल इंगळे यांनी सर्वांच्या सहकार्याने शाळेच्या विकासासाठी आदर्शवत काम करूया, असे सांगितले. संदीप कळसकर यांनी प्रास्ताविक केले. तर बाजूळंगे सर यांनी आभार मानले.यावेळी मुख्याध्यापक अवधूत सर, केंद्र प्रमुख एस बी राठोड मॅडम, चौधरी सर,बाजूळंगे सर,कवी आनंदा वारंगणे, विद्यार्थी, शिक्षकवृंद व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# १६ लाख विद्यार्थी देणार दहावीची परीक्षा

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) १ ते २६ मार्च या कालावधीत होणार आहे. परीक्षेसाठी १६ लाख ९ हजार ४४५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. ही परीक्षा सुरक्षित वातावरणात होण्यासाठीच्या उपाययोजना राज्य मंडळाने केल्या असून, २७१ भरारी पथके नेमण्यात आली आहेत. निवडणूक आचारसंहिता लागली, तरी परीक्षेवर फारसा परिणाम होणार नाही. राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. मंडळाच्या सचिव अनुराधा ओक, माणिक बांगर या वेळी उपस्थित होते. परीक्षेच्या कालावधीत विद्यार्थ्यांच्या समुपदेशनासाठी राज्य मंडळ स्तरावर दहा समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली आहे. उत्तरपत्रिकेची गोपनीयता राहण्यासाठी सहायक परीरक्षक बैठे पथक म्हणून परीक्षा केंद्रावर कार्यरत राहतील. तसेच प्रश्नपत्रिकांची गोपनीय पाकिटे ताब्यात घेतल्यापासून वितरित करेपर्यंतचे चित्रीकरण करण्यात येईल.

# सावळदबारा येथील ग्रामीण बँकेकडून शेतकऱ्यांना व्याजदरात मिळणार सवलत

## सवलतीची ३१ मार्चपर्यंत संधी : अध्यक्ष मिलिंद घारड

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा व परिसरातील डाभा, देव्हारी, फर्दापूर, घाणेगाव तांडा, नांदा तांडा, घाणेगाव तांडा, मोलखेडा, टिटवी, पळसखेडा, तोरनाळा,सह सावळदबारा व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासह मराठवाड्यातील साडेपाच लाख ग्राहकांना महाराष्ट्र ग्रामीण बँकेने ५ हजार ६०० कोटी रुपये कृषी कर्ज वाटप केले असून, यातील तीन लाख शेतकऱ्यांना शून्य टक्के व्याजाचा फायदा झाला आहे. यासह बँकेच्या डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेचा १ लाख ९६ हजार शेतकऱ्यांना फायदा झाला असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष मिलिंद घारड यांनी सोमवारी दि.२६/२/२४ ला पत्रकार परिषदेत दिली. या योजनेत लाभ घेण्याची ३१ मार्च पर्यंत शेतकऱ्यांना शेवटची संधी असल्याचेही त्यांनी नमूद केले.ही योजना ग्रामीण बँकेच्या ग्राहकांसाठी लाभदायी ठरली असून यात शासनाकडून प्राप्त झालेल्या निधी शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात येत आहे. यात यंदा एक लाख ९६ हजार ६९६ शेतकऱ्यांच्या खात्यावर ४३ कोटी ४१ लाख २ हजार ६१४ रुपयांचा लाभ देण्यात येत आहे. हे व्याज मिळवून देणारी महाराष्ट्र बँक राज्यात अव्वल ठरली आहे. गेल्या वर्षी शासनाकडून १ टक्के व्याज सवलतीपोटी ३ लाख ५३ हजार ३१७ शेतकऱ्यांच्या खात्यावर २६ कोटी ४४ लाख २९ हजार १८ रुपये जमा केले आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना येत्या ३१ मार्चवर केंद्र

व्याज सवलतीसाठी नियमित कर्जफेड महत्त्वाची पीककर्ज घेतल्यानंतर नियमित आणि दिलेल्या मुदतीत कर्ज परतफेड महत्त्वाची आहे. बँकेने आर्थिक वर्षांत ३ लाख ८ हजार ११३ शेतकऱ्यांना २ हजार ७८६ कोटी १५ लाखाचे विक्रमी पीककर्ज वाटप केले आहे. यात बँकेने १२३.४२ टक्के कर्ज वाटप केले आहे. आता २५० कोटी रुपयांची व्याजात सूट देण्याची तरतूद केली आहे. ४० हजार शेतकऱ्यांना ५० कोटींची व्याज माफी दिली आहे. जवळपास ४० टक्के शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ घेतला आहे. बँकेचे ९० हजार खाते एनपीए झाले आहेत. नियमित कर्ज परतफेड केली नाही, तर शेतकऱ्यांना १२ टक्के व्याज लागते. शासनाकडून मिळणारे ३ टक्के व्याज सवलतीपोटी २ लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात येणार आहे. बँकेच्या व्याज सवलत म्हणून नियमित कर्जफेड करणाऱ्या दोन लाख शेतकऱ्यांच्या खात्यावर १०० कोटी रुपयांचा लाभ होत आहे. असेही घारड यांनी सांगितले.

# राज्यात नर्सिंग अभ्यासक्रमाच्या ७०० जागा वाढणार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यात होणारा संसर्गजन्य आजारांचा प्रादुर्भाव लक्षात घेऊन पॅरावैद्यकीय अभ्यासक्रमामध्ये अमूलाग्र बदल करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यानुसार राज्यातील शासकीय महाविद्यालयांमध्ये परिचर्या अभ्यासक्रम महाविद्यालय (बीएससी नर्सिंग) सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील सात जिल्ह्यांतील रुग्णालयांमध्ये १०० विद्यार्थी क्षमता असलेले महाविद्यालय सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे लवकरच राज्यामध्ये बीएस्सी नर्सिंग अभ्यासक्रमाच्या ७०० जागा वाढणार आहेत.

शासकीय रुग्णालयांमध्ये येणाऱ्या रुग्णांना अधिक चांगले उपचार मिळावे यासाठी राज्यात नवीन परिचर्या महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या प्रत्येक महाविद्यालयामध्ये बीएस्सी नर्सिंग अभ्यासक्रमाच्या १०० जागा उपलब्ध करण्यात येणार आहेत.




# चोरुन नेलेला १० क्विंटल कापूस, वाहने जप्त

## शेवगाव पोलीसांची धडाकेबाज कारवाई : ४ आरोपी जेरबंद

आधुनिक केसरी न्यूज




**लक्ष्मण मडके**

**शेवगाव :** दि. २७ रोजी मध्यरात्री शेवगाव पोलीस स्टेशनचे नाईट राउँड चालु असतांना नाईट राउँड अंमलदार चापाहेकॉ बडे, पोकों संतोष वाघ, होमगार्ड मतीन असरफ बेग असे सरकारी जिपने रात्रगस्त करीत असतांना त्यांना अन्नपूर्णा जिनींग पैठण रोडचे भिंतीजवळ काही इसम संशयीत रित्या फिरतांना आढळुन आल्याने होमगार्ड मतीन बेग याने जिनींग मधील मॅनेजर मजीब महेबुब शेख यास फोन करुन उठवले, तेव्हा मजीब शेख हे बाहेर आले तेव्हा त्यांना चार चोरटे कापुस गोण्यामध्ये भरतांना दिसले, तेव्हा मुजीब बेग हा त्यांना अडवण्यास गेले असता चोरटयांनी त्यांचे हातातील चाकुचा व टामीचा धाक दाखवुन गप्प बस नाहीतर तुला जिवे ठार मारुन टाकु असा दम दिला. तरी देखील मुजीब शेख याने आरडा ओरडा केल्याने चोरटयाने लोखंडी टामी मुजीब शेख वाचे दिशेने फेकली परंतु त्याने ती हुकवली त्यानंतर आणखी कामगार उठल्याचे पाहुन चोरटे पळुन गेले. पळुन गेलेले चोरटे यांना पेट्रोलींग करणारे पोलीस यांनी पाठलाग सुरू करुन इतर पोलीस अंमलदार यांना बोलावुन घेतले आणखी पोलीस स्टाफ तसेच पेट्रोलींग अंमलदार यांनी चोरटयांचा पाठलाग करुन त्यांना शिताफीने पकडले. त्यांना पकडल्यानंतर जिनींग जवळ पाहणी केली असता तेथे मोटार सायकली, कापसाने भरलेल्या गोण्या व भोत व काही अंतरावर पांढरे रंगाची विनानंबरची पिकअप तिच्यामध्ये कापसाने भरलेल्या गोण्या व भोत होते. चौकशी दरम्यान पकडलेल्या आरोपींना त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांची नावे १) भानुदास बाबुराव गायकवाड २) राजु दत्ता बर्डे दोन्ही रा. देऊळगाव राजा जि. बुलढाणा, हल्ली रा. भारस्कर वस्ती शेवगाव ता. शेवगाव ३) विवेक योगराज पाटील रा. लासगाव ता.पाचोरा जि. जळगाव रा. भारस्कर वस्ती शेवगाव ता. शेवगाव ४) किरण कचरु मोहिते रा. मगर वस्ती शेवगाव ता. शेवगाव असे असुन अंधाराचा फायदा घेवुन काट्या-कुपाट्यातुन पळुन गेलेल्या इसमांची नावे- ५) संदीप वाघमारे रा. शेवगाव ६) बळीराम फुगे रा. जालना जिल्हा-जालना असे असल्याचे सांगितले आहे. तरी सदर घडले प्रकाराबाबत मुजीब महेबुब शेख रा. नाईकवाडी मोहल्ला शेवगाव यांनी दिलेल्या तक्रारीवरुन शेवगाव पोलीस स्टेशन गु.र.न.१६९/२०२४ भा.द. वि. ३९५,५०६ प्रमाणे दरोड्याचा गुन्हा दाखल झाला असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोसई/निरज बोकील हे करीत आहेत. सदरची कौतुकास्पद कामगिरी मा. पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला , मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. प्रशांत खैरे साहेब, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. सुनिल पाटील शेवगाव यांचे मार्गदर्शनाखाली शेवगाव पोलीस स्टेशनचे पोलीसचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री दिगंबर भदाणे, पोलीस उप निरीक्षक श्री निरज बोकील, पोलीस उप निरीक्षक श्री. अमोल पवार, पोहेकॉ/दराडे, चालक पोहेकॉ/बडे, पोहेकॉ/काळे, पोकॉ/संतोष वाघ, पोकॉ/शाम गुंजाळ, पोकों/अमोल ढाळे, पोकॉ/संपत खेडकर, पोकॉ/एकनाथ गरकळ, पोकॉ/कृष्णा मोरे, पोकॉ/राहुल खेडकर, होमगार्ड मतीन बेग, मोहिते, शिंदे, नयीम सय्यद, महेश घाडगे, रवी बोधले, होम पांडुरंग दहिफळे यांनी सदरची कामगिरी केली आहे.



# मनोज अग्रवाल आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित!

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय एन-7 सिडको छत्रपती संभाजीनगर शाळेतील उपक्रमशील शिक्षक श्री. मनोज अग्रवाल यांना हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनतर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला. सदरील कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शिक्षक आमदार मा.श्री. विक्रम काळे सर यांनी भूषविले. हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री. शेख अब्दुल रहीम सर व इतर पदाधिकारी हे देखील सदरील कार्यक्रमास उपस्थित होते.

मनोज अग्रवाल यांनी शाळेतील विदयार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवले आहेत. तसेच मनपा शाळा एन -7 सिडको शाळेत मनोज अग्रवाल विदयार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देतात. त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

प्राप्त झाल्याबद्दल मनपा प्रशासक मा. श्री. जी. श्रीकांत सर, मनपा उपायुक्त मा. श्रीमती नंदा गायकवाड मॅडम, शिक्षणाधिकारी मा. श्री. भारत तीनगोटे सर, मुख्याध्यापक मा. श्री. शेख अहमद पटेल सर, सर्व सहकारी शिक्षक, मित्र परिवार यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# कौशल्य क्लासेसचा शुभचिंतन समारंभ संपन्न

आधुनिक केसरी न्यूज




**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** कौशल्य क्लासेसच्या वतीने खंडाळा येथे दहावीतील विद्यार्थ्यांचा शुभचिंतन समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन करण्यासाठी इतिहास अभ्यासक दशरथ ननावरे यांना आमंत्रित करण्यात आले होते.यावेळी दशरथ ननावरे यांनी विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणादायी व नवचेतना निर्माण करणारे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना अभ्यास कसा केला पाहिजे. यांपासून ते आपल्या समोर आलेल्या संकटावर मात कशी करायची याचे दाखले दिले.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यपद्धतीचा विशेष उल्लेख त्यांनी केला. यावेळी संस्थेचे संचालक सागर घाडगे,सागर भोसले यासह दहावीचे विद्यार्थी उपस्थित होते.

दशरथ ननावरे म्हणाले की,छत्रपती शिवाजी महाराजांनी नियोजनाच्या बळावर स्वराज्य उभे केले. संकटातून मार्ग काढण्यासाठी योजना आखल्या त्यामुळे यश मिळाले.कोणत्याही कामाचे योग्य नियोजन तुम्हाला यशाच्या शिखरावर घेऊन जाते.शालेय वयात अभ्यासातील सातत्य ठेवून प्रत्येक विषयाच्या मूळाशी पोहचून आकलनपूर्वक अभ्यास केला तर अपयशाला सामोरे जावे लागणार नाही. जीवनात यश प्राप्त करण्यासाठी योग्य नियोजन व कामाची वेळेत सुरुवात करायला हवी.असे सुद्धा त्यांनी सांगितले. मुलांनी विद्यार्थीदशेतच ध्येय निश्चित केले पाहिजे.आयुष्यात यशस्वी होण्यासाठी उत्तुंग ध्येय समोर ठेवले पाहिजे.जिद्द,चिकाटी आणि प्रयत्नातील सातत्य कायम ठेवून त्या ध्येयाचा पाठलाग करायला हवा.जीवनात हमखास यश मिळवायचे असेल तर आत्मविश्वास हवा. आत्मविश्वासाच्या बळावर ध्येयाला गवसणी घालता येते असा विश्वास सुद्धा त्यांनी व्यक्त केला.पुढे दशरथ ननावरे असेही म्हणाले की,

जीवनात संकट हे कधीच अडवायला येत नाहीत तर ती आपणाला घडवायला येतात. संकट कितीही मोठे असूद्या मनातील भीती बाजूला सारून संकटांवर स्वार व्हायला शिका. पुढे जाण्यासाठी संकटांना संधी मानून काम केले तर तुम्ही यशाच्या शिखरावर निश्चित पोहचाल. आपल्यातील कमतरतांचे कारण पुढे करून अडून बसू नका.त्यांना बलस्थाने बनवा तुमचा यशाचा मार्ग मोकळा होईल.तुमच्या ध्येयापर्यंत पोहचण्यासाठी तुम्हाला कोणीही रोखू शकत नाही.हे सुध्दा त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

# कारागृहातील बंदीवानाचा महिला रक्षकावर प्राणघातक हल्ला

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** भंडारा जिल्हा कारागृहातील एका बंदीने कर्तव्यावरील महिला रक्षकावर प्राणघातक हल्ला केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या बंदीवानाने वरिष्ठ अधिकाऱ्यांना शिविगाळ करुन त्यानाही जीवानिशी मारण्याची धमकी दिली आहे. या प्रकारामुळे कारागृह प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे. शाम उर्फ पिटी चाचेरे, वय ३५ असे या हल्लेखोर बंदीवानाचे नाव आहे. जिल्हा कारागृह वर्ग १ येथे महिला रक्षक ही न्यायाधीन बंदीवानांना व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे मुलाखती घेत असताना न्यायाधीन बंदी शाम उर्फ पिटी चाचेरे याची मुलाखतीची वेळ संपत आली होती. त्यामुळे महिला रक्षकाने त्याला पाच मिनीट शिल्लक राहिले असे बोलले असता आरोपीने कर्तव्यावरील महिला रक्षकासोबत वाद घातला. त्यानंतर त्याची मुलाखतीची वेळ पूर्ण झाल्याने महिला रक्षकाने व्हिडीओ कॉल बंद केला. त्यावर आरोपी बंदीने राग व्यक्त करत कर्तव्यावरील महिला रक्षकाच्या अंगावर धावून हल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्यांना शिविगाळ करुन शासकीय कामात अडथडा निर्माण केला. तेव्हा महिला रक्षकाने वरिष्ठ अधिकाऱ्यांना गैरवर्तन केल्याची माहिती दिली. गुन्हा दाखल माहिती मिळताच वरिष्ठ अधिकारी हे मुलाखती कक्षात आले असता आरोपी बंदीवानाने वरिष्ठ अधिकारी संतोष क्षीरसागर आणि गुलाब खरडे यांना तुम्ही मला बोलू देत नाहीत, असे बोलून अश्लील शिविगाळ केली.

# मरीआईची वाडी फाटा ते पिंपरे बुद्रुक रस्त्याचे काम चालू होत नाही तोपर्यंत रास्ता रोको करणार

आधुनिक केसरी न्यूज



**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** गेली अनेक दिवसांपासून मरीआईचीवाडी फाटा ते पिंपरे बुद्रुक या रस्त्याबाबत बावकलवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते व परिवर्तनम फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश केसकर यांच्या कडून लक्ष वेधले जाते आहे.हा रस्ता दुरुस्तीत यावा. म्हणून यापूर्वीच निवेदन देण्यात आलेले आहे. परंतु हा प्रश्न मार्गी लागत नसल्याने पुन्हा एकदा संबंधित विभागांना गणेश केसकर यांनी निवेदन दिलेले आहे.

सार्वजनिक बांधकामे विभाग खंडाळ्याचे उप अभियंता आणि खंडाळा तहसीलदार यांच्या कडे या रस्त्याचे गाऱ्हाने निवेदनातून मांडलेले आहे.

निवेदन देत असताना गणेश केसकर यांनी म्हटलेले आहे की, या खराब रस्त्याचे खूप दिवस प्रलंबित असलेले काम लवकरात लवकर चालू करावे अन्यथा रास्ता रोको आंदोलन करण्याबाबत निर्णय घ्यावा लागेल असा इशारा सुद्धा दिला आहे. निवेदनात असे म्हटले आहे की,इतर जिल्हा मार्ग ६ मध्ये मोडत असलेला मरीआईचीवाडी ते पिंपरे पर्यंतचा रास्ता गेली ३ वर्ष झाली खराब अवस्थेत असल्याने स्थानिक नागरिकांना खूप त्रास सहन करावा लागत आहे.०२ जुलै २०१४ ला रस्त्याचे काम चालू झाले होते ते काम ०१ मार्च २०१६ पूर्ण झाले.काम पूर्ण झाल्यापासून ५ वर्षासाठी संबंधित कंपनी कडे तो रास्ता मेंटेनंसाठी असतो.१ मार्च २०२१ ला रास्ता मेन्टेनसाठीचा कार्यकाळ संपला आहे.हा वेळ संपून ३ वर्ष झाली असून आम्ही संबंधित विभागाला वारंवार या बाबत आम्ही पाठपुरावा केला.१५ नोव्हेंबर २०२२, ७ मार्च २०२२, १२ जानेवारी २०२४ या तारखेला आम्ही समक्ष भेट घेऊन निवेदन ही दिली.तसेच वारंवार संबंधित विभागाचे लक्ष आम्ही या समस्येकडे वेधले आहे आणि विभागाने ही आमचे म्हणणे ऐकून घेऊन त्या वेळेला रस्त्याचे डागडुजीचे काम करण्याचे आदेश संबंधित कॉन्ट्रॅक्टर ला दिले होते.परंतु कामाचा दर्जा खूपच खराब पद्धतीने पूर्ण केल्याने रास्ता लगेचच खराब होत होता. यामुळे लोकांच्यात नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांकडून आता नवीन रस्त्याची मागणी मोठ्या प्रमाणात केली जातेय आणि ही मागणी रास्तच आहे.असे सुद्धा म्हणण्यात आलेले आहे. पुढे असे म्हटलेले आहे की,१२ जानेवारी २०२४ या तारखेला संबंधित अधिकाऱ्याशी चर्चा केली असता त्यांनी आम्हाला फेब्रुवारी संपेपर्यंत कामाला सुरुवात होईल असे सांगितले. नेहमीप्रमाणे आम्हाला अजून एक आश्वासन मिळाले.आजपर्यंत रस्त्याच्या कामाला त्यांनी दिलेल्या शब्दाप्रमाणे सुरुवात झाली नाही. त्यामुळे आमच्याकडे कोणताही पर्याय उरलेला नाही.म्हणून येणाऱ्या ४ मार्च २०२४ पर्यंत जर रस्त्याच्या कामाला सुरुवात नाही झाली तर पंचक्रोशीतील सर्व नागरिक आम्ही जो पर्यंत काम चालू हात नाही तो पर्यंत रास्ता रोको करणार आहोत याची आपण नोंद घ्यावी व खूप दिवस प्रलंबित असलेल्या खराब रस्त्याच्या कामाला सुरुवात करावी.असा इशारा सुद्धा देण्यात आलेला आहे.आपणास विनंती आहे कि, आपण या विषयात लक्ष घालावे आणि लवकरात लवकर नवीन रस्त्याचे काम सुरु करून नागरिकांना होणार नाहक त्रास कमी करावा.असे गणेश केसकर यांनी म्हटलेले आहे.

# मराठी शेतकरी साहित्य संमेलन : नाना पाटेकर करणार उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजीराव सोनवणे**


**नाशिक :** कल्पनाविश्वात रमणाऱ्या आभासी शेतीसाहित्याची शेतीमधल्या प्रत्यक्ष उद्यमीतेच्या उत्क्रांतशील वास्तवाशी नाळ जोडण्यासाठी, सांप्रत शेती व्यवसायाला जखडणाऱ्या मानवनिर्मित बेड्यांची आणि त्यातून निर्माण होणाऱ्या दाहक समस्यांची मराठी साहित्यविश्वाला जाणीव करून देण्यासाठी, नवसाहित्यिकांना सशक्त व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासोबतच त्यांच्या शेतीअर्थशास्त्र, अनर्थशास्त्र व नवतंत्रज्ञानाविषयीच्या जाणिवा समृद्ध करण्यासाठी, मराठी साहित्य-सारस्वतांची कृषि उद्योगीजगतासोबत सांगड घालून त्यांना कर्तव्यपूर्तीसाठी प्रेरित करण्यासाठी आणि लेखणीच्या माध्यमातून शेतीची दुर्दशा थांबवून शेतकऱ्याच्या आयुष्यात सुखाचे व सन्मानाचे दिवस खेचून आणण्याइतपत शक्तिशाली सृजनशील साहित्यिकांची नवीन पिढी निर्माण करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न म्हणून सोमवार, दि. ४ व मंगळवार, दि. ५ मार्च २०२४ रोजी युगात्मा शरद जोशी विद्यानगरी, सह्याद्री फार्म्स परिसर, मोहाडी ता. दिंडोरी जि. नाशिक या कर्तव्यभूमीत दोन दिवसीय ११ वे अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

शेती उद्योग क्षेत्रात भरीव कामगिरी करून शेतीउद्योगाला नवी दिशा देणाऱ्या मोहाडी (जि. नाशिक) येथील सह्याद्री फार्म्स परिसरात आयोजित संमेलनाचे संमेलनाध्यक्षपद ज्येष्ठ साहित्यिक तथा समीक्षक भानू काळे भूषविणार असून नाम फाउंडेशनचे संस्थापक तथा आघाडीचे सिने कलावंत नाना पाटेकर संमेलनाचे उदघाटन करणार आहेत. संमेलनाला वऱ्हाडी कादंबरीकार तथा म. रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ सदस्य पुष्पराज गावंडे, ज्येष्ठ शेतकरी नेत्या सरोजताई काशीकर, ज्येष्ठ शेतकरी नेते ॲड वामनराव चटप, रामचंद्रबापू पाटील विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. सह्याद्री फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि. चे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विलास शिंदे स्वागताध्यक्षपदाची धुरा सांभाळणार असून कार्याध्यक्ष म्हणून गंगाधर मुटे यांची तर संयोजक म्हणून मुंबई हायकोर्टाचे जेष्ठ विधिज्ञ ॲड सतीश बोरुळकर, यांची निवड करण्यात आली आहे.

संमेलनाच्या आयोजनाकरिता विविध समित्यांचे गठन करण्यात आले असून आयोजन समितीमध्ये डॉ. प्रा. मनीषा रिठे, प्रमोद राजेभोसले, ज्ञानेश उगले, शंकरराव ढिकले, जयंत बापट, सोपान संधान, निवृत्ती कर्डक, प्रा. डॉ. कुशल मुडे, दिलीप भोयर, रविंद्र दळवी, सारंग दरणे, गणेश मुटे यांचा प्रामुख्याने समावेश आहे.

मागील काही वर्षापासून शेतकरी आत्महत्यांनी धारण केलेले विक्राळरूप, कधी कोरडा तर कधी ओला दुष्काळ अशा अस्मानी संकटामुळे उत्पादनात येणारी प्रचंड घट, शेतमालाच्या पडत्या बाजारभावामुळे व वाढलेल्या उत्पादन खर्चामुळे डबघाईस आलेले शेतीचे अर्थशास्त्र, मागील पाच वर्षांपासून सततची नापिकी, कधी चक्रभुंगा तर कधी बोंडसड, कधी कपाशीवर बोंडअळी तर कधी तुरीवर मर रोग यामुळे शेतीतील उत्पन्नासोबतच उत्पादनही मोठ्या प्रमाणावर घटले आहे, विजेचे बिल देखील






भरण्याची शेतकऱ्यांची ऐपत उरलेली नाही. अशा बिकट स्थितीतही "रोजचेच मढे, त्याला कोण रडे" अशा निर्विकारपणे शेतीव्यवसायाकडे बघण्याची शासकीय व प्रशासकीय यंत्रणेची मानसिकता तयार झाली आहे त्यामुळे प्रसारमाध्यमे वगळता अन्य कोणत्याही आघाडीवर याविषयीचा फ़ारसा उहापोह होतांना दिसत नाही. राजकीय आणि शासकीय आघाड्यावर शेतीला आधार देणाऱ्या उपाययोजना शोधण्याऐवजी सक्तीने व बळाचा वापर करून वीजपुरवठा खंडित करण्याच्या भीमगर्जना केल्या जात आहेत. समाजाचा आरसा समजल्या जाणाऱ्या साहित्यक्षेत्रात सुद्धा यापेक्षा वेगळी स्थिती नाही.

शेतकऱ्याची मुले शिक्षण घेऊन अन्य व्यवसायात गेली, पोटापाण्याचा प्रश्न सुटल्याने लिहिती होऊन अभिव्यक्त व्हायला लागली पण त्यांनाही शेतीच्या वास्तवाकडे अभ्यासपूर्ण आपुलकीने पाहावेसे वाटत नाही, हे शेतीव्यावासायाचे फार मोठे शल्य आहे. गेल्या १५-२० वर्षांमध्ये देशात लक्षावधी शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत; पण त्याचे प्रतिबिंब साहित्यात प्रभावीपणे उमटलेले नाही.

शेतीच्या वास्तवतेवर सर्वकष प्रकाश टाकणारे, खोलवर अभ्यासपूर्ण मांडणी करून शेतीच्या दुर्दशेच्या कारणांचा शोध घेणारे, शेतीतील गरिबीचे, ग्रामीण भारतातील दुर्दशेचे खरेखुरे कारण सांगणारे आणि तशी अभ्यासपूर्ण मांडणी करून योग्य मूल्यमापन करणारे आणि त्यावर आवश्यक उपाययोजनांची चाचपणी करून जाणिवा समृद्ध करणारे पुस्तक मराठी साहित्यविश्वात आजही उपलब्ध नसणे ही बाब मराठी साहित्यक्षेत्राचे खुजेपण दर्शविणारी आहे. साहित्यक्षेत्रातील शेतीप्रधान साहित्याची उणीव भरून काढण्यासाठी अ.भा. मराठी शेतकरी साहित्य चळवळ कार्यरत असून या प्रयत्नाचाच एक भाग म्हणून २०१५ मध्ये पहिले अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन वर्धा येथे, २०१६ मध्ये दुसरे अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन नागपूर येथे, २०१७ मध्ये तिसरे अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन गडचिरोली येथे, २०१८ मध्ये चवथे अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन मुंबई येथे, २०१९ मध्ये ५ वे अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन, पैठण (औरंगाबाद) येथे, २०२० मध्ये ६ वे अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन, अलिबाग (रायगड) येथे तर कोरोना आपत्तीमुळे २०२१ साली ७ वे अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन ऑनलाईन पद्धतीने, २०२२ मध्ये ८ वे अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन रावेरी (यवतमाळ) येथे, सप्टेंबर २०२२ मध्ये ९ वे ऑनलाईन संमेलन आणि जानेवारी २०२३ मध्ये गुरुकुंज आश्रम (अमरावती) येथे आयोजित करून पिढ्यानपिढ्याच्या अबोलतेला बोलते, लिहिते व वाचते करण्याच्या यशस्वी प्रयत्न करण्यात आला आहे. शेतकरी साहित्य चळवळीच्या प्रयत्नांना यश येऊन साहित्यिकांची नवीन पिढी अभ्यासपूर्ण वास्तवचित्र आक्रमक आणि सडेतोडपणे रेखाटायला लागली आहे.

११ व्या मराठी शेतकरी साहित्य संमेलनाचे स्वरूप आपापल्या कौशल्यगुणांचं, प्रतिभेचं प्रदर्शन मांडून वाहवा मिळवणाऱ्या हौश्या-गौश्या-नवश्यांचा जमाव यापुरतेच केवळ मर्यादित न राहता साहित्यिकांना कल्पनाविस्ताराठी बौद्धिक मेजवानी देणारे प्रशिक्षण शिबीर ठरावे आणि सशक्त लेखणीच्या माध्यमातून इंडियाच्या बरोबरीने भारतालाही समृद्ध व संपन्न करण्यासाठी हातात लेखणी घेऊन लढणाऱ्या लढवैया सृजनशील साहित्यिकांची नवीन पिढी निर्माण करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करण्याचा उद्देश या संमेलन आयोजनामागे आहे. या संमेलनात उदघाटन सत्र, शेतकरी कवी संमेलन, शेतकरी गझल मुशायरा, परिसंवाद, कथाकथन असे विविधांगी सत्र असणार आहेत .या संमेलनात ज्येष्ठ साहित्यिक, राजकीय नेते, ज्येष्ठ शेतकरी नेते, शेती अर्थशास्त्राचे गाढे अभ्यासक, अर्थतज्ज्ञ इत्यादी अनुभवी वक्ते भाग घेणार आहेत. तरी सर्व शेतीप्रेमी साहित्यिक आणि रसिकांनी जास्तीत जास्त संख्येने अग्रीम प्रतिनिधी नोंदणी करून उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## २ मार्चपासून भदंत पंयाबोधी थेरो चाळीस उपासकांसह थायलंड दौऱ्यावर

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** येथील अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्राचे संचालक, संघनायक तथा धर्मगुरू भदंत पंयाबोधी थेरो हे येत्या २ मार्चपासून बौद्ध राष्ट्र थायलंडच्या धम्माभ्यास दौऱ्याकरिता येथील हुजुरसाहेब नांदेड रेल्वेस्थानकावरुन सकाळी ७.०० वा. रवाना होणार आहेत. ते तेलंगणा मार्गे बँकाक, पाटाया, धम्मगया, आयुथाया या ठिकाणी जाणार असून तेथील बौद्ध संस्कृती व लोकजीवनाचा अभ्यास करणार आहेत. धम्माभ्यास दौऱ्याकरिता जाणाऱ्या बौद्ध उपासक उपासिकांसाठी मंगल कामना व्यक्त करण्यासाठी सकाळी रेल्वे स्थानकावर उपस्थित राहण्याचे आवाहन प्रशिक्षण केंद्राच्या वतीने देण्यात आले आहे. श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या वतीने बौद्ध उपासक उपासिकांसाठी जगातील बौद्ध राष्ट्रांचा अभ्यास दौरा आयोजित करण्यात येतो. मार्च महिन्यात २ मार्चपासून १० मार्चपर्यंत सदरील दौरा आयोजित करण्यात आला आहे. यात भदंत पंयाबोधी थेरो यांच्यासह मारोतराव उबारे, वंदना उबारे, निला भद्रे, भीमराव भद्रे, अनिता डोंगरे, श्रीरंग डोंगरे, भारती अटकोरे, छाया जाभाडे, उर्मिला जाभाडे, संभाजी कांबळे, संगिता निकाळजे, सुनील निकाळजे, प्रज्ञा नरवाडे, जयश्री गोवंदे, लक्ष्मी गायकवाड, ज्योती अंभोरे अरुणा पंडित, धोंडिबा लोणे, अनिता लोणे, शांताबाई आठवले, शंकर आठवले, मीनाक्षी खंदारे, चांदू खंदारे, अरुणा नरवाडे, गणपत नरवाडे, मंगल दवणे, पंजाबराव दवणे, श्रद्धा दवणे, प्रिया दवणे, संचिता दवणे, अनुरत्न वाघमारे, रोहित गजभारे, इंदुताई गजभारे, भीमराव गजभारे, विमलताई जोंधळे, चांदू जोंधळे आणि अरुणाबाई कांबळे यांचा समावेश आहे.

## १५ पोलीस अधिकाऱ्यांची जिल्ह्याबाहेर बदली

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर यापूर्वी २ टप्प्यात नाशिक परिक्षेत्रातील पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या झालेल्या असून पुन्हा ५९ पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यात नगर जिल्ह्यातील १५ अधिकाऱ्यांच्या जिल्ह्याबाहेर बदल्या झाल्या असून त्यांच्या जागी १५ अधिकारी जिल्ह्यात बदलून आले आहेत. नगरमधील पोलिस निरीक्षक ज्योती गडकरी व विजय करे यांची नाशिक ग्रामीणला बदली झाली आहे. नाशिक ग्रामीण मधून रविंद्र मगर व नंदुरबार येथून भरत जाधव नगरमध्ये आले आहेत. जिल्ह्यातील सहाय्यक पोलिस निरीक्षक सोमनाथ दिवटे, रामचंद्र कर्पे, युवराज आठरे यांची नाशिक ग्रामीणला, राजु लोखंडे, गणेश वारुळे यांची नंदुरबारला तर महेश येसेकर यांची जळगाव येथे बदली झाली आहे. त्यांच्या जागी नाशिक ग्रामीण येथून शिवाजी तांबे, एकनाथ ढोबळे, मयूर भामरे, वर्षाताई जाधव हे ४ अधिकारी नगर जिल्ह्यात आले आहेत. नगर जिल्ह्यातील ७ पोलिस उपनिरीक्षकांच्या नाशिक ग्रामीणला बदल्या झाल्या आहेत. त्यामध्ये गजेंद्र इंगळे, अश्विनी मोरे, युवराज चव्हाण, योगेश चाहेर, श्रीकांत डांगे, शैलेंद्र जावळे, अनिल भारती यांचा समावेश आहे. तर ९ जण जिल्ह्यात बदलून आले आहेत. त्यात कैलास कपिले, अश्विनी टिळे, अशोक मोकळ, पांडुरंग कावळे, रमेश पाटील, विक्रांत कचरे, विनोद परदेशी, महेश शिंदे हे ८ अधिकारी नाशिक ग्रामीण येथून बदलून आले आहेत. तर जयेश गांगुर्डे हे धुळे येथून आले आहेत. जिल्ह्यात बदलून आलेल्या २४ अधिकाऱ्यांना पदस्थापना या बदल्यांच्या ३ टप्प्यात जिल्ह्यात बदलून आलेल्या २४ अधिकाऱ्यांना पोलिस अधीक्षक राकेश ओला यांनी पदस्थापना दिल्या आहेत. त्या पुढील प्रमाणे पोलिस निरीक्षक दौलत जाधव- भरोसा सेल, अरविंद जोंधळे- दहशतवाद विरोधी शाखा, रविंद्र मगर – आर्थिक गुन्हे शाखा, भरत जाधव – जिल्हा विशेष शाखा, सहाय्यक पोलिस निरीक्षक अजय गोरड – श्रीगोंदा पोलिस ठाणे, संदीप वसावे – कर्जत पोलिस ठाणे, देवेंद्र शिंदे – राहुरी पोलिस ठाणे, महेश माळी – शेवगाव पोलिस ठाणे, शिवाजी तांबे – पाथर्डी पोलिस ठाणे, एकनाथ ढोबळे – वाचक अप्पर पोलिस अधीक्षक कार्यालय, श्रीरामपूर, मयूर भामरे – कोपरगाव पोलिस ठाणे, वर्षाताई जाधव – जामखेड पोलिस ठाणे, पोलिस उपनिरीक्षक आण्णासाहेब परदेशी – शहर वाहतूक शाखा, युवराज अहिरे – पारनेर पोलिस ठाणे, कैलास कपिले – कोतवाली पोलिस ठाणे, अश्विनी टिळे – शिर्डी पोलिस ठाणे, अशोक मोकळ – संगमनेर तालुका पोलिस ठाणे, पांडुरंग कावळे – राजूर पोलिस ठाणे, रमेश पाटील – संगमनेर शहर पोलिस ठाणे, विक्रांत कचरे – वाहतूक शाखा, शिर्डी, विनोद परदेशी – एमआयडीसी पोलिस ठाणे, महेश शिंदे – जिल्हा विशेष शाखा, जयेश गांगुर्डे – नगर तालुका पोलिस ठाणे, शैलेश पाटील – तोफखाना पोलिस ठाणे.

## झाडावर भरधाव दुचाकी धडकल्याने एकाचा मृत्यू एक जखमी; शिर्डी शहरातील घटना

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** शहरात बुधवार दिनांक २८ फेब्रुवारी रोजी रात्री



नादुर्खी रोडवर झालेल्या दृदेवी दुचाकी अपघातात दुचाकी वरील नियंत्रण सुटल्याने झाडावर आढळून झालेले अपघातात दुचाकी वरील साहिल सुदाम गोंदकर वय २५ या तरुणाला डोक्याला जबर मार लागल्याने व अतिरक्तस्राव झाल्याने मृत्यू झाला असल्याची सूत्रांनी दिली यावेळी पाठीमागे बसलेला सत्यम कुहीले वय २५ हा देखील जबर जखमी झाला अपघात होताच नागरिकांनी दोघांना तात्काळ लगतच्या शिर्डी शहरातील साईबाबा सुपर हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते. दुचाकीच्या पाठीमागे बसलेल्या सत्यम कुहिले वय २५ यास पोटाला डोक्याला व छातीला जबर मार लागल्याने पुढील उपचारासाठी नाशिक येथील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. मयत साहील गोदकर हा शिर्डी येथील हॉटेल व्यावसायिक व इलेक्ट्रॉनिक साहित्य विक्रेते सुदाम चांगदेव गोंदकर यांचा मुलगा असून वसंत गोदकर याचा तो पुतन्या आहे या रोडवर या अगोदर देखील अपघात झालेले असून या अपघातात काहीचे बळी गेलेले आहे गोदकर कुंटबातील प्रेमळ व मनमिळाऊ मोठा मित्र वर्ग असलेल्या साहील यांच्या अपघाती अकाली मृत्यूमुळे शिर्डी शहरात मोठ्या प्रमाणावर हळहळ व्यक्त करण्यात येत आहे शोकाकुल वातावरणात त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या प्रसंगी शिर्डी ग्रामस्थ मोठ्या प्रमाणावर हजर होते.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

## गुड न्यूज, मेट्रोचा प्रवास होणार स्वस्त

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** शाळा, महाविद्यालये आणि इतर शैक्षणिक संस्थाना लागणा-या उन्हाळ्याच्या सुट्ट्या लक्षात घेता महामेट्रोने मेट्रोच्या प्रवासी भाड्यात कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. १ मार्च २०२४ (शुक्रवार) पासून नवीन दर लागू होणार आहे. सध्याच्या भाड्याच्या तुलनेत ३३ टक्के भाडे कमी करण्यात आले आहे. नवीन भाड्यामुळे इतर कुठल्याही सवलतीवर याचा प्रकारचा परिणाम होणार नसून महा मेट्रोद्वारे विध्यार्थ्यांना प्रदान करण्यात येत असलेली ३० टक्के सवलत कायम राहणार आहे. नागपूर हे देशातील सर्वात उष्ण शहरांपैकी एक असून उन्हाळ्यातील तापमान अनेकदा ४५ अंश सेल्सिअसच्या पार करत असते व शहरातील रस्ते रिकामे होऊन नागरिक कमी प्रमाणात घरा बाहेर पडत असतात. महा मेट्रोने प्रवासी भाड्या मध्ये बदल करून एका प्रकारे कमी भाड्यात वातनुकूलित मेट्रो डब्यांमधून प्रवास करून उष्णतेवर मात करण्याची संधी दिली आहे. आता नागपूरकर या उन्हाळ्यात आरामात प्रवास करता येणार आहे. सध्यास्थितीत सिताबर्डी इंटरचेंज ते लोकमान्य नगर पर्यंत मेट्रोने प्रवास केल्यास ३० रुपये द्यावे लागतात जे की आता २५ रुपये एवढे असतील व ३० टक्के विध्यार्थी सवलतीसह हे १८ रुपये एवढे असेल. अलीकडच्या काळात, नागपूर मेट्रोची प्रवासी संख्या ७५ हजारच्या आसपास असून, पूर्वीप्रमाणेच प्रवासी संख्या सव्वा लाखापर्यंत मिळवणे हा या सुसूत्रीकरणाचा उद्देश आहे.

# शाळांच्या माध्यमातून देशविचारांशी एकरूप, तन्मय नागरिक घडावा

## सरसंघचालक भागवत : ज. स. जनवार जन्मशताब्दी समारोहाची सांगता

आधुनिक केसरी न्यूज

**नागभीड :** शाळांच्या माध्यमातून आपल्याला या देशाशी एकरूप असणारा, तन्मय असणारा तसेच या देशाच्या विचारांशी आणि आचारांशी बांधील असलेला नागरिक घडवायचा आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी येथे केले. यातूनच त्या व्यक्तीचा विकास होईल, भारत मोठा होईल आणि जगाला सुख-शांतीचा मार्ग गवसेल, असेही ते म्हणाले.

नागभीडच्या गोंडवन विकास संस्थेचा सुवर्ण जयंती महोत्सव आणि स्व. ज. स. जनवार शताब्दी महोत्सवाच्या समारोप सोहळ्यात सरसंघचालक बोलत होते. व्यासपीठावर गोंडवन विकास संस्थेचे अध्यक्ष राजाभाऊ देशपांडे, सचिव रवींद्र जनवार आणि आमदार कीर्तिकुमार भांगडिया उपस्थित होते.

शिक्षणातून स्वस्वरूप ओळखता येते, त्यातून स्वावलंबनही येते. आपल्या शैक्षणिक संस्थेतून शिकून गेलेले विद्यार्थी आपल्या पायावर उभे झाले पाहिजे. त्यांनी तक्रारी करीत बसायला नको नाही. त्यांच्यात इतका आत्मविश्वास निर्माण झाला पाहिजे की, जगात जेथे जाईल तेथे आपल्या पायावर उभा राहून आपल्या परिवाराचे पोट त्याला भरता यायला हवे, अशी अपेक्षाही सरसंघचालकांनी व्यक्त केली.

शालेय शिक्षणातून मुलांना दिशा मिळते. जगण्याचे सामर्थ्य, आत्मविश्वास मिळतो. आपल्याला चांगला मनुष्य, देशाचा जबाबदार नागरिक आणि विश्वमानवतेचा उत्कृष्ट घटक बवायचे आहे. ही दिशा शालेय शिक्षणातून मिळते, याकडेही त्यांनी लक्ष वेधले.




डॉ. मोहनजी भागवत म्हणाले, महाविद्यालयांमध्ये ज्या प्रवृत्ती बनायच्या, त्या बनून गेलेल्या राहतात. त्यावेळी स्वभाव बदलणे कठीण होते. शैशवावस्थेत स्वभाव घडतो. हे जडणघडणीचे वय असते. त्या काळात मुले आपल्या हातात असतात. त्यांना असे वळवता आले पाहिजे म्हणून शाळा असतात. अशा शाळा चालवल्या म्हणून आपण जनवार गुरुजींची जन्मशताब्दी साजरी करीत आहोत. हाच विचार करून संघ आणि संघ विचारांच्या शाळा चालतात. सरसंघचालक पुढे म्हणाले की, शिक्षण हे उदाहरणातून मिळते. भाषण आणि पुस्तकातून त्याचा पुरेसा बोध होत नाही. जसे आहे तसे दिसते. आणि ते पुस्तकाशी आणि भाषणाशी जुळते, तेव्हा त्याचा परिणाम होतो. आपल्यासारखे लोक परिश्रम करून चांगले होतात. त्याचे अनुकरण मुले करतात. घरून पालकांनी दिलेली दिशाही महत्त्वाची असते. आपण मुलांना नेहमी खूप पैसा मिळव, हेच सांगत राहिलो तर तो पुढे आपल्यालाही विचारणार नाही. निव्वळ पैसा मिळवेल. आपण रवींद्र जनवार यांच्या वडिलांची जन्मशताब्दी साजरी करीत आहोत. त्यांनी मूल्यशिक्षणासाठी आपले आयुष्य खर्ची घातले. गोंडवनाचा विकास व्हावा अशी त्यांची इच्छा होती. स्वत्वाकडे वळले की विकास होतो. शिक्षणातून आपल्या स्वरूपाचे दर्शन होते. मुक्ती, मोक्ष म्हणजे आपल्या स्वरूपाचे दर्शन. मी कोण हे ओळखणे हे सर्वात मोठे शिक्षण आहे. सा विद्या या विमुक्तये, असे आपल्याकडजे म्हंटले आहे. म्हणजे विद्या ती, जी मुक्त करते. अशा प्रकारची विद्या देणारी विद्यालये स्थापन करण्यासाठी जनवार गुरुजींनी आपले आयुष्य खपवले, असे मोहनजी म्हणाले.

हे माझं हे तुझे हे छोट्या बुद्धीचे विचार आहेत. ज्यांचे हृदय विशाल आहे, ते संपूर्ण विश्वाला आपले कुटुंब मानतात. आपण हिंदू आहोत अशी आपली ओळख पटली की आपोआप हा विचार मनात येतो. असे शिक्षण मिळाले पाहिजे, त्या शिक्षणातून विकास होतो. चांगले शिकून लोक शहरात न जाता खेड्यापाड्यात राहतात. कारण काय आपलेपणा. हा आपलेपणा शिकवला की बाकीच्या गोष्टी आपोआप येतात. संपूर्ण देशात आपलेपणा उत्पन्न झाला पाहिजे, हा संघाचा विचार आहे आणि हाच हिंदूंचा परंपरागत विचार आहे. संविधानाचाही तोच विचार आहे. देशात भावनिक एकता उत्पन्न झाली पाहिजे, असा स्पष्ट उल्लेख संविधानात मार्गदर्शक तत्वात आहे. शाळेतून हे शिक्षण मिळावे, अशी जनवार गुरुजींची अपेक्षा होती, म्हणून त्यांनी अशा शाळा सुरू केल्या, ही बाबही संरसंघचालकांनी अधोरेखित केली.

# शिवसेना उत्तर नगर जिल्हा प्रमुखपदी कमलाकर कोते

आधुनिक केसरी न्यूज



**शिर्डी :** शिवसेना पक्षाच्या उत्तर नगर जिल्हा प्रमुख पदी कमलाकर कोते यांच्या कामाची दखल घेत जिल्हाप्रमुख पदी फेर नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्याकडे उत्तर नगर जिल्ह्यातील राहता संगमनेर अकोला या तालुक्यात बरोबरच राहुरी तालुक्यातील ३२ गावांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्ती बद्दल पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी अभिनंदन केले आहे.

क्षेत्रफळाच्या दृष्टीने नगर जिल्ह्यात शिवसेना पक्षाच्या उत्तर नगर जिल्ह्यातील कार्यकारणीत काही फेरबदल करत नव्या चेहऱ्यांची नियुक्ती केली आहे. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांबरोबरच धर्मवीर आनंद दिघे यांच्या समाजकार्याचा वसा पुढे घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे याचे समर्थक कमलाकर कोते यांना पुन्हा संधी मिळाली आहे यापूर्वी त्यांच्याकडे राहता संगमनेर अकोला या तीन तालुक्यांची जबाबदारी देण्यात आली होती मात्र त्यांच्या कार्याची दखल घेत अधिकच्या राहुरी तालुक्यातील ३२ गावांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

कोते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार सदाशिव लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार संघातील प्रश्न सोडविण्यासाठी मोठी मदत झाली असून त्यांच्या कार्याची वेगळी ओळख निर्माण केली आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्यासह भाजपचे पदाधिकारी यांच्याशी योग्य ताळमेळ ठेवला आहे. तसेच महायुतीतील कोपरगांव विधानसभा मतदारसंघाचे आमदार आशुतोष काळे,माजी आमदार स्नेहलता कोल्हे, अकोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. किरण लहामटे, माजी आमदार भानुदास मुरकुटे आदी नेत्यांबरोबर सातत्याने समन्वयाची भूमिका घेऊन विकासाची कामे पूर्ण करण्यासाठी महत्वपूर्ण भूमिका निभावली असून पक्ष संघटना मजबूत आणी वाढीसाठी प्रामाणिक प्रयत्न केले आहे.




# पोल्ट्री व्यवसायातून दरवर्षी 15 लाखांची कमाई

आधुनिक केसरी न्यूज

**सोनई :** महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्न असलेल्या कृषी महाविद्यालय सोनई येथील ग्रामीण जागरुकता आणि कृषी औद्योगिक कार्यानुभव या कार्यक्रमा अंतर्गत रांजणगांव ता. नेवासा. येथे कृषिदूत सुजित सातपुते, सार्थक वालतुरे, रोणित विरकर, भूषण सांगळे, तेजस मिस्किन यांनी व्यवसाय बाबाद मार्गदर्शन केले. शेतीला जोडधंदा म्हणून मत्स्यव्यवसाय, पशुपालन, कुक्कुट पालन अशा अनेक प्रकारचे व्यवसाय केले जातात. याचा अनेक शेतकऱ्यांना फ़ायदा होतो,त्याचा भाग म्हणून या कल्पनेचा अवलंब नेवासा तालुक्यातील रांजणगाव येथील शेतकरी अंकुश कानडे ह्यांनी केला. दरवर्षी कुक्कुट पालन या व्यवसायातून सरासरी 15 ते 20 लाखांचे उत्पन्न ते मिळवण्यात यशस्वी झाले आहे. सध्या 100 बाय 30 चे त्यांचे 3 शेड असून त्यात एकूण 3000 पिल्ले आहेत. त्यांच्या सुरक्षेची काळजी घेऊनच हे शेड उभारल्या गेले आहे. प्रत्येक पिल्लांला विक्री होत पर्यंत 3 किलो खाद्य लागते. पिल्लांना दिल्या जाणाऱ्या लसिबद्दल माहिती देताना त्यांनी सांगितले की लसोटा ही लस पिलांना 6 दिवसां नंतर आणि गंभोरा ही लस 12 दिवसांनी दिलेली आहे. त्यांना 1 ते 14 दिवस प्री स्टार्टर, 15 ते 45 दिवस स्टार्टर आणि त्यानंतर फिनिशर अश्या तीन प्रकारचे खाद्य दिले जाते. पूर्णतः वाढ झाल्यानंतर त्याची विक्री नगर किंवा मुंबई येथे केली जाते. आणि अश्याप्रकारे उत्पन्न मिळवले जाते. शेतीला पूरक असा हा व्यवसाय शेतकऱ्यांसाठी खरंच फायदेशीर ठरला आहे.

# सोनई आरोग्य केंद्राच्या वतीने ऊसतोड कामगारांसाठी आरोग्य शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**सोनई :** संदिप दरंदले-आज मुळा सहकारी साखर कारखाना येथे प्राथमिक आरोग्य केंद्र सोनई आणि मुळा सहकारी साखर कारखाना यांचे संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र शासनाच्या उन्नत्ती प्रकल्प अंतर्गत ऊसतोड कामगारांसाठी आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले. या शिबीराचे उद्घाटन प्राथमिक आरोग्य केंद्र वैद्यकीय अधिकारी डॉ. विधाते आणि मुळा कारखाना जनरल मॅनेजर श्री शंकरराव दरंदले यांचे हस्ते झाले. या शिबीरात क्षयरोग, महिलांमधील कॅन्सर, बालकांचे लसिकरण करण्यात येणार असल्याची माहीती डॉ.विधाते यांनी दिली. ऊसतोड कामगारांच्या व्यस्त जीवनात शिबीराचा मोठा फायदा होणार असल्याचे आरोग्य सहाय्यक रमेश जावळे यांनी सांगितले. 3 मार्च पल्स पोलिओ मोहीमेत 5 वर्षाखालील बालकांना पोलिओ लस पाजुन घ्यावी असे आव्हान आरोग्य सहाय्यिका श्रीमती लिला तोगे यांनी केले. शिबिर उद्घाटन प्रसंगी शेतकी अधिकारी व्ही एच फाटके, परचेस अधिकारी लक्ष्मणराव बारगळ सिएचओ डॉ. सुनिल वाघ, डॉ. पुनम भुसारी, डॉ. प्रज्ञा आव्हाड, डॉ.चंद्रकला गागरे पी एच सी आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, परिचर, कारखाना कर्मचारी, ऊसतोड कामगार ऊपस्थित होते.



# शिरवळच्या ग्लोरी स्कूलमध्ये विज्ञान दिन; प्रदर्शनाचे आयोजन, विद्यार्थ्यांनी बनवले उपकरण




आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून शिरवळ, ता.खंडाळा येथील ग्लोरी इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शन व शालेय साहित्य प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या प्रदर्शनात इयत्ता पहिले ते नववीच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतल्याने हे प्रदर्शन विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणारे ठरले. विद्यार्थ्यांनी अनेक वैज्ञानिक उपकरणे बनवलेली होती. या विविध उपकरणांमुळे विज्ञान दिन हा मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या विज्ञान प्रदर्शनाच उद्घाटन ब्लॉसम स्कूल वीर चे संस्थापक चेतन महांगरे आणि संध्या महांगरे यांच्या हस्ते करण्यात आले. विविध स्वरूपातील वैज्ञानिक उपकरणे पाहून चेतन महांगरे आणि संध्या महांगरे यांनी विशेष समाधान व्यक्त केले. विद्यार्थ्यांचे कला कौशल्य पाहून दोघेही भारावून गेले. ग्लोरीचे विद्यार्थी म्हणजे एक रत्नाची खानच आहे. विद्यार्थ्यांत असलेला सुप्त गुणांना वाव देणारी पंचक्रोशीतील एकमेव शाळा असा उल्लेख सुध्दा त्यांच्या कडून करण्यात आला. शाळेचे संस्थापक मुख्याध्यापक जितेंद्र भणगे यांनी शाळेत शिक्षकांकडून होत असलेल्या वेगवेगळ्या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले. शाळेत होत असलेल्या विविध उपक्रमाविषयी माहिती शाळेच्या उपमुख्याध्यापिका वैशाली भणगे यांनी पालक व प्रमुख पाहुणे यांना करून दिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शितल भणगे, नूतन जाधव, ज्योती लोखंडे, विद्या भारती, सविता कांबळे, ओमिका चौधरी, सोनल बर्गे, हेमा दीक्षित, अर्चना गायकवाड, किरण खोपडे, वैशाली खोपडे, सोनाली बोराटे, दिपाली कुंभार, दिपाली पवार, जया डेमडे, वर्षा शिंदे आदी शिकवृंदांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्या भारती यांनी केले. रंगतदार कार्यक्रमाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# मराठीचा सातत्यपूर्ण गौरव अभिमानास्पद : गुडसूरकर

आधुनिक केसरी न्यूज



**सगरोळी :** मराठी भाषेचा गौरव हा केवळ एक दिवसापुरता न ठेवता त्यासाठी सातत्यपूर्ण उपक्रम राबविणारे श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल हे मराठी भाषा संवर्धक असल्याचे मत महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य धनंजय गुडसूरकर यांनी केले. सगरोळी येथील श्री शिवाजी विद्यालयात य मराठी भाषा गौरव दिनी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. मराठी ज्ञानपीठ विजेते कवी कुसुमाग्रज यांची जयंती शाळेतील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात विविध गुणदर्शनाने साजरी केली. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते प्रसिद्ध कथाकार, लेखक, वक्ते मुक्तपत्र कार श्रीमान धनंजय गुडसूरकर यांच्या कथाकथनाने विद्यार्थी मंत्रमुग्ध झाले. तसेच विद्यार्थ्यांनी 'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी 'या सुंदर गीताने कार्यक्रमाची सुरुवात करून त्यात मराठी पोवाडा व मराठी बतावणी मुलांनी सादर केले. प्लास्टिक मुक्ती साठी मुलांनी छोटीशी नाटिका 'मले बाजाराला जायचं नाही' सादर केली. मुख्याध्यापक संभाजी गायकवाड कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.उप मुख्याध्यापक संभाजी विभुते, पर्यवेक्षक व शाळेतील सर्व शिक्षक वृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते. नवनाथ माने यांनी कार्यकमाचे प्रास्तविक केले. वैभवी हराळे हिने सुत्रसंचालन तर दिव्या खंदारे हिने आभार मानले. आकाश शिंदे, कैलास कोदळे, जनार्दन गुट्टे, सुनिता पांडे, विठ्ठल हराळे यांनी यासाठी पुढाकार घेतला.



# 'कल्लोळ' कलाकारांनी घेतले साईंचे दर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** आगामी मराठी बहुचर्चित असलेला व सिनेरसिकाना मोठी उत्सुकता लागलेल्या चित्रपट लग्न कल्लोळ चित्रपटाच्या संपुर्ण टीमने शिर्डी येथे येत जगाला श्रध्दा व सबुरीचा संदेश देणा-या श्री साईबाबांच्या मंदिरात जाऊन श्री साईबाबा समाधीचे मनोभावे दर्शन घेतल्यानंतर अभिनेता सिद्धार्थ जाधव व अभिनेत्री मयुरी देशमुख यांनी समाधान व्यक्त केले त्यांचा श्री साईबाबा संस्थान वतीने मंदिर प्रमुख रमेश चौधरी, साईबाबा संस्थानचे संरक्षण अधिकारी पोलीस उपनिरीक्षक रोहिदास माळी प्र. जनसंपर्क अधिकारी तुषार शेळके उपस्थित होते. आदीसह विविध मान्य उपस्थित होते.अभिनेता सिध्दार्थ जाधव म्हणाले की साईच्या प्रती असलेली श्रध्दा व सर्व कोट्यवधी साईभक्त भाविकांच्या मनोकामना पुर्ण होतात तसा अनुभव देखील अनेकांचा राहिलेला माझा देखील अनुभव असल्याने सर्व टिम बरोबर आपण साई दर्शन घेण्यासाठी आलो होतो या ठिकाणी आल्यावर मोठी मनशाती मिळाल्याचे जाधव यांनी सांगितले यावेळी या कलाकारांना बघितल्यावर अनेक साईभक्त भाविकांच्या गर्दीतून साई नामाचा गजर मोठ्या प्रमाणावर सुरू होता.

# जेनेरिक औषधी ओळखण्यासाठी त्यावर वेगळा मार्क असावा

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** तालुक्यात शासन स्तरावर जेनेरिक औषधांचा वापर वाढवण्यासाठी प्रयत्न केले जात असले तरी कुठलाही ठराविक मार्क नसल्याने सर्वसामान्यांना जनरिक औषधे कुठली हे ओळखणे कठीणच झाले आहे. त्यात एमआरपी वर सूट देण्याचे प्रमाणही मेडिकल न्याय वेगळेच आहे एकाच कंपनीच्या एकाच औषधांच्या किमतीत दोन दुकानात सारखेपणा नसल्याने सर्वसामान्यांना ही जनरिक औषधे ओळखता यावीत याकरता त्यावर विशिष्ट मार्क असावा. यासाठी शासन स्तरावर प्रयत्न होण्याची गरज असल्याची अनेक रुग्णांनी बोलून दाखवले. या अगोदर अनेक वर्षा पासुन केवळ ब्रँडेड कंपनीच्या औषधी उपलब्ध होत्या. परंतु त्याची दर अधिक असल्याने त्याला पर्याय म्हणून जनरिक औषधी समोर आली ब्रॅण्डेड कंपनी पेक्षा स्वत मिळत असल्याने हल्ली जनरिक औषधांचा वापर वाढलेल्या दिसून येतो आहे. दुकानांमध्ये गेल्यानंतर मात्र सर्वसामान्य रुग्णाला दुकान चालक आपल्याला जनरीक औषधी देतोय का? हे लक्षात येत नाही. त्यामुळे अनेक वेळा जेनेरिकच्या नावाखाली ब्रँडेड औषधी दिली जाते. कधीकधी जनरिक औषधी दिली तरी त्यावर असलेल्या एमआरपीच्या तुलनेत दिली जाणारी सूट देखील वेगळी आहे. म्हणजेच कुठे दहा टक्के तर काही दुकानावर 20% तर कुठे त्यापेक्षाही 70 टक्के सूट दिली जाते. यामुळे हे औषधी ओळखण्यासाठी त्यावर विशिष्ट मार्क असावा अशी मागणी होत आहे. जिंतूर तालुका तसा डोंगराळ भाग असून ग्रामीण खेडेपाड्यांनी युक्त असा भाग आहे त्यामुळे ग्रामीण भागात तर जनरिक काय हे लवकर लक्षात येणे ही अवघड दिसून येते.

**एकाच औषधाची वेगवेगळ्या दुकानात वेगवेगळी किंमत** : आमच्या दैनिक आधुनिक केसरींच्या वार्ताहर यांनी खातर जमा करण्यासाठी एका रुग्णाला डायबिटीस साठी औषधे लिहून देण्यात आली . होती . ब्रँडेड कंपनीची 145 रुपये एमआरपी रुपयांना होती . तेच जनरिक मध्ये हेच घटक असलेले औषध 87 रुपयांमध्ये एमआरपी मिळते त्याला दुसऱ्या मेडिकल चालकाने 20% सूट देऊनही औषध दिले परंतु आणखीन एका मेडिकल कडे गेल्यानंतर तीच औषधी फक्त वीस रुपयांमध्ये उपलब्ध करून दिली .यात दोन्ही मेडिकल शॉप चालकांनी एकाच कंपनीचे जनरिक औषध उपलब्ध करून दिले परंतु किंमत मात्र खूप वेगळी वेगळी होती .

जेनेरिक औषधे ओळखण्यासाठी त्यावर काहीतरी वेगळा मार्ग असावा जेणेकरून विक्री किंमती बाबतही नियंत्रण राहील यामुळे सर्वसामान्यांची फसवणूक होणार नाही . शासन स्तरावर याबाबत लवकर निर्णय घेऊन कार्यवाही करावी . **आजमत खान पठाण, नागरीक**



जनरिक औषधावर सर्वसामान्यांना ओळखण्यासाठी वेगळा मार्क असावयास हवा त्यामुळे औषधनिहाय किंमत वेगळी व त्यावर मिळणारा नफा ही सर्वसामान्यांच्याही लक्षात येण्यासारखी बाब आहे . किंमत वेगळी असल्याने ही औषधे आम्ही साधारण दहा ते वीस टक्के नफा ठेवून विक्री करतो . **केमिस्ट अँड ड्रगिस्ट, व्यवसायिक जिंतूर .**



# संवाद हीच भाषेची खरी ओळख

## प्रा. डॉ. योगिता पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** कोणतीही भाषा ही श्रेष्ठ, कनिष्ठ नसते. सर्वच भाषा आपापल्या पातळीवर चांगल्याच असतात. भाषेला प्रमाणसह कोणतीही मोजमापे लावणे अयोग्य आहे. जी कळते, जी समजते, जी जाणवते, जी शिकवते, कृतिशील बनवते व बोलण्यास प्रवृत्त करते ती भाषा असते. याच अंगाने विचार केल्यास संवाद हीच भाषेची खरी ओळख आहे असे प्रतिपादन झेड. बी. पाटील महाविद्यालयाच्या मराठी भाषा विभागप्रमुख, लेखिका, वक्त्या प्रा. डॉ. योगिता आशुतोष पाटील यांनी केले. त्या मराठी भाषा गौरव दिनानिमित्ताने धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे पत्रकार भवन येथे दि. २७ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानाप्रसंगी बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त उपप्राचार्य विलास चव्हाण होते. तर वक्ते म्हणून नॅक कमिटीने बेस्ट रिसर्च स्कॉलर म्हणून गौरविलेले प्रा. डॉ. घनश्याम थोरात उपस्थित होते. कार्यक्रमाला महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य अध्यक्ष अविनाश पाटील, लोकजनशक्ती पार्टीचे जिल्हाध्यक्ष दिलीपआप्पा साळवे, महिला जिल्हाध्यक्षा शोभाताई चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवातीला वि.वा. शिरवाडकर अर्थात कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पण करून पूजन करण्यात आले. आपल्या अभ्यासपूर्ण व खास शैलीत संत व महापुरुष तसेच महनीय व्यक्तींच्या विचारांचे दाखले व विविध उदाहरणे देत प्रा. डॉ. योगिता आशुतोष पाटील यांनी 'मराठी भाषेचे जीवनातील महत्व' या विषयाची अत्यंत साध्यासोप्या स्वरूपात मांडणी केली. प्रा. पाटील म्हणाल्या की, भाषा ही मानवाला संवादी बनविते. भाषा विचार करायला, बोलायला शिकविते म्हणून संवाद हीच भाषेची खरी ओळख आहे. आजच्या आभासी युगात दृश्य प्रतिमा मानवी जीवनावर जणू आक्रमणाचा करताहेत. ही आक्रमणे माणसाला विचार कार्याला वेळच देत नाहीत. विचारप्रक्रियेला चालना देतात. या शब्दप्रतिमांनीच भाषेचे महत्व टिकून आहे. म्हणूनच समाजात राहताना, कुटुंबात वावरताना आपण कायम संवादी राहिले पाहिजे. सूत्रसंचालन पत्रकार संघाचे सचिव सचिन बागुल यांनी केले तर पत्रकार संघाचे अध्यक्ष मनोज गर्दे यांनी आभार मानले. याप्रसंगी एबीपी माझा मराठी वृत्तवाहिनीचे जिल्हा प्रतिनिधी धनंजय दीक्षित, पत्रकार संघाचे उपाध्यक्ष अतुल पाटील, कोषाध्यक्ष तुषार बाफना, प्रांतिक प्रतिनिधी प्रकाश शिरसाठ, माजी अध्यक्ष रवींद्र इंगळे, चंद्रशेखर पाटील, मिलिंद बैसाणे, नुरखान पठाण, पुरुषोत्तम गरुड, विद्यमान कार्यकारिणी सदस्य रवींद्र नगराळे, प्रा. मोहन मोरे, पुरुषोत्तम पाटील, आकाश सोनवणे, आवेश पठाण, पंकज पाटील, दीपक शिंदे, राकेश गाळणकर, अजिंक्य देवरे, वाल्मिक पाटील, जमील शाह, कार्यालयीन अधीक्षक सुभाष वाघ यांच्यासह पत्रकार बांधव तसेच श्रोते उपस्थित होते.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर